अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
www.surajyadigital.com | गुरुवार, दि.१३ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १९४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८






मा.श्री.
## धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील
यांना वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !

। शुभेच्छुक ।

- **शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज**
  ता.माळशिरस जि.सोलापूर
- **श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज**
  ता.माळशिरस जि.सोलापूर
- **शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर-अकलूज**
  ता.माळशिरस जि.सोलापूर

# लगाम लावाच...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमधील एक मंत्री असलेले भाजपाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्या तोंडाला चिकटपट्टी लावण्याची वेळ आलीय,असे दिसते. त्यांचे सातत्याने वादग्रस्त बोलणे अतिच झाले.या महाराष्ट्राने आणि भाजपाने त्यांना आतापर्यंत खूप सहन केले.आता नाही सहन होत. त्यांची विधाने विरोधकांना घाव घालणारे नसून भाजपा व विशेष करून फडणवीस यांना अडचणीत आणणारी ठरत आहेत.बोलायलाही काही मर्यादा असतात.आपण सरकारमध्ये आहोत.त्यामुळे सामाजिक भान ठेवून बोलायला हवे,इतके तारतम्य पाटलांसारख्या ज्येष्ठ आणि अभ्यासू नेत्याकडे नसावे,ही पक्षाची मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. पाटील यांनी बाबरी मशीद पाडण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून भाजप पक्षश्रेष्ठी आणि पक्षातही नाराजी असणे स्वाभाविक आहे. त्यांच्या या वक्तव्यावर फडणवीस यांनी खुलासा केला असता तर



पक्षावर मोठी नामुष्की ओढवली असती. फडणवीस यांच्याऐवजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत निरोप देवून पाटील यांना खुलासा करायला लावला. याप्रकरणी फडणवीस यांनीही अलिप्त राहून व मौन पाळून ' पाटील यांचे हे वैयक्तिक मत असून भाजपचे नाही,' असे स्पष्टीकरण प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना करण्याची सूचना केलेली असावी. पाटील यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे भाजापची अनेकदा पंचाईत झाली आहे. त्यावेळी फडणवीस यांनी सारवासारव केली किंवा त्याबाबत पाटील यांना सूचना केली. पण बाबरी मशीद शिवसेना कार्यकर्त्यांनी पाडली नाही किंवा तसा कट शिवसेना भवनात शिजला नव्हता, असे वक्तव्य करून पाटील यांनी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा अवमान केल्याने शिंदेंसह त्यांच्या गटातील नेतेही चिडले. शिंदे यांनी आपली नाराजी भाजपा पक्षश्रेष्ठींच्या कानावर घातल्याचे समजते. त्यामुळे फडणवीस यांच्याऐवजी थेट शिंदे यांनीच पाटील यांना पत्रकार परिषद घेऊन खुलासा करायला लावला. भाजपाच्या एखाद्या नेत्याने वादग्रस्त वक्तव्य केले, तर प्रदेशाध्यक्ष किंवा फडणवीस यांच्याकडून त्याला स्पष्टीकरण करण्याची सूचना दिली जाते किंवा गरज असेल तेव्हा तंबीही दिली जाते. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप २४० जागा लढवेल व शिंदे गटाला ४० जागा मिळतील, असे वक्तव्य नुकतेच केले होते. तेव्हा फडणवीस यांनी बावनकुळे यांच्याशी बोलून खुलासा करण्याची सूचना केली होती. पाटील यांच्या आताच्या वक्तव्यामध्ये मात्र फडणवीस अलिप्त राहिले किंवा ठेवले गेले. त्यांनी सारवासारवही केली नाही. मात्र पाटील यांचे वक्तव्य ही भाजपाची भूमिका नसल्याचा खुलासा बावनकुळे यांना करण्याची सूचना केली. भाजपाच्या माजी प्रदेशाध्यक्षांचे वक्तव्य हे त्यांचे वैयक्तिक मत आहे आणि त्यांना खुलासा करण्याची सूचना सहकारी पक्षाचा प्रमुख करतो, अशी पाळी भाजपमध्ये क्वचितच आली आहे. पाटील यांचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहांशी निकटचे संबंध आहेत, असे नेहमी सांगितले जाते. मात्र त्यांनी बाळासाहेब ठाकरेंसंदर्भातच वक्तव्य केल्याने पक्षश्रेष्ठी आणि राज्यातील नेत्यांमध्येही नाराजी आहे. भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांमध्ये अनेक मुद्द्यांवर खटके उडत असताना बावनकुळे आणि पाटील यांच्या वक्तव्यांमुळे त्यात भर पडली आहे. आगामी निवडणुकांना सामोरे जाताना भाजप व शिंदे गटात मतभेद वाढले, तर ते परवडणारे नसल्याने पक्षश्रेष्ठींनी थेट हस्तक्षेप केल्याचे सूत्रांनी सांगितले.पाटील हे ज्येष्ठ आहेत. भाजपाच्या यशात त्यांचे योगदान आहे म्हणून काय झाले? त्यांनी वाट्टेल ते बोलावे काय? पक्षाची शिस्त पाहाता सरकारी निर्णयांवर आणि विरोधकांच्या भूमिकेवर एक प्रदेशाध्यक्ष किंवा फडणवीस यांनी बोलणे उचित ठरते.पाटील हे कोण लागून गेले? केवळ एक मंत्री.बेताल बोलण्याने आपल्या तोंडावर शाई पडली,याचे भान पाटलांना राहू नये,हे अत्यंत दुर्दैवी आहे. उद्धव ठाकरे वा संजय राऊत यांच्यावर टीका केली असती तर मराठी माणूस ॅकरणे कितपत योग्य आहे. शिवसेनाप्रमुखांवर कुणीही टीका केली तर ती राज्याला सहन होत नाही.हे आता राज्यातील संताप पाहून भाजप श्रेष्ठींच्या लक्षात आलेले असावे.भाजपासारख्या केडर पार्टीत फक्त प्रदेश अध्यक्षांनी मत मांडावे,अशी शिस्त आहे पण आता उठसूठ कोणीही काहीही बोलत आहे.पाटलांच्या तोंडाला वेसण घालण्याची वेळ आलीय.त्यांचा राजीनामा घ्या किंवा तुम्हीतर द्या, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिले आहे पण आता पाटलांना मंत्रीमंडळातून हाकलून द्या,अशी म्हणण्याची वेळ राज्यावर येवू नये,एवढी काळजी पक्षश्रेष्ठींनी आताच घ्यायला हवी.

ऐतिहासिक

# रक्तरंजित हत्याकांडाची आठवण

(आज या अमृतसरमधील मधील जालियनवाला बाग मधील रक्तरंजित हत्याकांडाला १०४ वर्षे पूर्ण झाली. आजच्या दिवशी १०३ वर्षापूर्वी जनरल डायरने वीस हजार माणसांच्या सभेवर बेछूट गोळीबार केला होता. ती वेळ होती सायंकाळची... ४ वाजत तीस मिनिटे... जालियन वाला बाग म्हणजे तीस बाजूनी असलेली एक बखळच होती. या बवळीत जाण्यासाठी एकच अरुंद वाट होती. ब्रिटिश जनरलला डायरने एकूण सोळाशे हत अधिक फेटी झाडल्या. या फेटीत अनेक मुले, वृध्द व नागरिक मृत्यूमुखी पडले. अरूंद वाट असल्याने डायरनला तोफा नेता आल्या नाहीत. या गोळीबारात हाहाकार उडाला. नंतर ब्रिटिश सरकारने सुमारे २%९ माणसे मृत्यू झाल्याचे अधिकृत पणे सांगितले . पण अधिकृत अंदाज सुमारे हजारापेक्षाही जास्त होता. देशभर या हत्याकांडानंतर देशप्रेमाची भावना अधिकच जागत झाली. जनरल डायरनेच्या शोधात काही देशप्रेमी युवक होते. त्यातील उधमसिंग नावाच्या तरूणाने जो जालियनवाला बाग हत्याकांडात जखमी झाला होता त्याने १३ मार्च १९४० साली पंजाबचा गव्हर्नर असलेल्या मायकेल आडेवायरला ठार मारले. ३१ जुलै १९४० रोजी तो फाशीला सामोरा गेला. या जालियन वाला बागेच्या हत्याकांडाची ही रक्तरंजित कहाणी)

जालियनवाला बाग हे पंजाबमधील अमृतसर मधील एक ठिकाण.. ब्रिटिश सरकारने १९१८ साली मांटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा जाहीर केल्या. या सुधारणा जाहीर होताच देशभर याचा विरोध झाला. यानंतर रोलेट कायदाही अंमलात आणला गेला. त्या कायद्याबाबत रहिवाशांना पूर्ण माहितीही नव्हती. यानंतर श्रीनिवास शास्त्री ब महात्मा गांधी यांनी या कायद्याबाबत कठोर टीका केली. या नंतर देशभर आंदोलनाचा भडका उडाला.लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांना पंजाबात येण्यास ब्रिटिश सरकारने बंदी घातली.या बंदीमुळे आगीत तेल ओतल्याची परिस्थिती निर्माण झाली. अमृतसर येथे ६ एप्रिल १९१९ रोजी हरताळ पाळण्यांत आला. सरकारने पंजाबमधील नेते किचलू ब सत्यपाल यांच्या वर भाषण बंदीचा आदेश बजावला. शेवटी शेवटी याचा कहर म्हणजे ११



एप्रिल १९१९ रोजी संपूर्ण अमृतसर शहर लष्कराच्या ताब्यात देण्यांत आले. पण या आदेशाला या दोनही नेत्यांनी जुमानले नाही. त्यांनी. नेमका हा दिवस प्रतिपदेचा होता. तसेच रविवार होता. अन् याच दिवशी शिखांचा बेशाखी सण होता.जालियनवाला बाग हे मैदान सुमारे ६ ते % एकर एवढे होते. लष्करी सत्तेला न जुमानता लाला हंसराज ब किचल् यांनी जालियन वाला बाग येथे१३ एप्रिलला जाहीर सभा होईल असे जाहीर केले. या दिवशी कोणत्याही बैठका किंवा मिटिंग्ज घडविण्यावर ब्रिटिश सरकारने बंदी घातली होती. विशेष म्हणजे नोटीस मात्र सर्व ठिकाणी नव्हती. जालियन वाला बाग येथे सभा सुरू झाली अन् सायंकाळी ४.३० मिनिटांनी जमावावर अमानुष गोळीबार सुरू झाला. या गोळीबारांत अनेक मुले , वृध्द सापडले. पहिल्या दहा मिनिटांतच सुमारे १६५० हून अधिक फेरी झाडण्यांत आल्या.

अनेकांनी जालियन बाला बाग येथील विहरींत जीव वाचविण्यासाठी उड्या ठोकल्या. त्यातही अनेक जण मृत्यूमुखी पडले.सुमारे १२० मृतदेह त्यातून बाहेर काढण्यांत आले. गोळीबारांत मृत्यू पावलेल्यांचा अधिकृत मृत्यूचा आकडा ब्रिटिशांनी ३%९ एवढा जाहीर करण्यांत आला. पण अनधिकृत अंदाजानुसार १५०० पेक्षाही जास्त माणसे मृत्यू मुखी पडली होती. आजही जालियन वाला बागेत असलेल्या स्मृती फलकावर दोन हजार लोकांचा बळी गेलेल्यांची नोंद आहे जखमींची संख्याही काही हजारात होती. यावरही कळस म्हणजे ब्रिटिश सरकारने अमृतसरचा वीज व पाणी पुरवठा काही दिवस बंद ठेवला.यानंतर देशांत राष्ट्रीय भावना उफाळली. या हत्याकांडाचे पडसाद ब्रिटिश संसदेतही उमटले. ब्रिटिश संसदेने २४% विरुद्ध ५३७ अशा मताधिक्क्याने डायरनेच्या विरोधांत मतदान केले. विस्टर्न चर्चील यांनी जालियनवाला बाग ही घटना इतिहासातील काळीकुट्ट घटना असल्याचा उल्लेख केला या हत्याकांडानंतर कवी रविंद्रनाथ टागोर यांनी ब्रिटिश पदव्यांचा त्याग केला.या जालियन वाल बाग हत्याकांडानंतर देशांत १९२० ते २२ मध्ये घडलेल्या असहकार चळवळींची बीजे रोविली गेली. जालियन वाला बाग हत्याकांडानंतर १०२० साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने एक ठराव पास करून स्मारक बनविण्याचे ठरविले. त्या स्मारकासाठी १९२३ साली एका ट्रस्टची स्थापना केली गेली. बेंजामिन पोल्क या अमेरिकन व्यक्तीकडे स्मारकाचे डिझाईन करण्याचे काम होते. स्मारक पूर्ण होऊन त्याचे उद्घाटन भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते ब पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत १३ एप्रिल १९६१ या दिवशी झाले.आजही या ठिकाणी स्मारकाच्या भिंतीवर गोळीबाराच्या खुणा आहेत. तसेच ज्या विहरींत लोकांनी उड्या मारल्या ती विहरही संरक्षित स्मारक म्हणून आहे. १४ ऑक्टोबर १९९% रोजी ब्रिटिश साम्राज्याच्या राणी एलिझाबेथ द्वितीय यांनी राजपुत्र फिलिप याच्यासह या बागेत येऊन शहोदांप्रति संवेदना प्रकट केली.. व अप्रत्यक्षपणे ब्रिटिशांची अमानुष गोळीबारांची चूक कबूल केली. एकूणच भारतीय स्वातंत्र लढ्यातील जालियन वाला बाग हत्याकांड हा एक रक्तरंजित इतिहास आहे. आज बरोबर १०३ वर्षापूर्वी हे हत्याकांड घडले होते. या हत्याकांडानंतर भारतीय राष्ट्रवादाने वळण घेतले व राष्ट्रीय भावना अधिकच उफाळली व स्वातंत्र्यासाठी जोरदार प्रयत्न केले गेले. या हत्याकांडाच्या शताब्दीनिमित्त त्या हत्याकांडांत शहीद झालेल्या वीरांना भावपूर्ण श्रद्धांजली...

– शांताराम वाघ, पुणे

टुडेज् ब्लॉग

# मतभेदांचे एकत्रिकरण नको

आपल्यामधील वादाचा अथवा मतभेदाचा विषय जो आहे फक्त त्यावरच चर्चा होऊन त्यावर सकारात्मक उपाययोजना काढणे, ते शक्य नसल्यास तो वाद बाजूला ठेवून त्या व्यक्तीशी असलेली इतर कामे, इतर संबंध, इतर संवाद अतिशय व्यवस्थित सुरू ठेवणे, इतर काहीही त्या ऐका मतभेदामुळे अथवा वादाच्या विषयामुळे बिघडू न देणे अशी विचारसरणी प्रत्येकाने अंगीकरणे अत्यंत आवश्यक आहे.

माणूस म्हटलं की वादविवाद, मतभेद, ऊहापोह, मनस्ताप, संताप, त्रागा, अहंकार हे आलेच. कोणत्याही दोन व्यक्ती अथवा समूह ते कोणत्याही नात्यातील असोत, कोणत्याही वयोगटातील असोत आणि कोणत्याही कारणास्तव त्यांच्यात संभाषण असो, विषय भरकटत जाणे, एका वादामधून दुसरा वाद, एका गैरसमजामधून दुसरा गैरसमज लांबतच जातो. एका विषयावर एकमेकांबद्दल असलेला राग किंवा एखाद्या मुद्द्यावर मतभेद आहेत पण त्याचा सगळ्याच विषयावर परिणाम करून, सगळंच एकत्र करून सर्वच बाबतीत आपला दृष्टिकोन चुकीचा ठेवून आपणच आपली चांगली परिस्थिथी, चांगली नाती, जवळची चांगली माणसं, हितसंबंध, चांगले चाललेले आयुष्य बिघडवून टाकत असतो हे आपल्या ध्यानी-मनी नसते.

प्रत्येकाला कुठे न कुठे दुसऱ्याचे काहीतरी आवडत नसते स्वभाव असेल, वागणूक असेल, निर्णय असतील अथवा सवयी असतील त्यात तफावत असतेच. कारण प्रत्येकजण वेगळा असतो. खूप ठिकाणी असं लक्षात येतं की लोकं मनात अढी धरून बसण्यात खूप पटाईत असतात. कोणाशी एका मुद्द्यावरून भांडण असेल तरी त्याला सर्वच बाबतीत शत्रू किंवा दुश्मन समजून वागवतात.



आयुष्यभर त्याच्याशी अबोला धरणे, त्याचा तिरस्कार करत राहणे, त्याच्या बाबतीत सगळाच चुकीचा विचार करणे अशा वागणुकीमुळे माणसं दुरावतात, त्यांच्यापासून मिळणारे इतर सहकार्य, इतर काही मदत, मार्गदर्शन, सहाय्य, त्यांचे इतर चांगले विचार, त्यांच्याकडून शिकण्यासारख्या इतर काही गोष्टी या पण आपण अशा स्वभावामुळे दूर करतो. आपल्याला आयुष्यात हेच समजणे आणि हेच जमणे खूप महत्त्वाचे आहे की, घरातील सर्व वस्तू जशा आपण वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने व्यवस्थित रचना करून ठेवतो आणि तसं केलं नाही तर घरात पसारा होतो आणि कोणतीच वस्तू वेळेवर कामी येत नाही, सापडत नाही. आपल्या मनातील, डोक्यातील प्रत्येकाबाबतचे विचार, अनुभव, मत पण आपल्याला स्वतंत्र ठेवून त्यानुसार वागता आले पाहिजे. घरातील सामानात जसा पसारा झाल्यावर त्रास होतो तसाच त्रास मनातील डोक्यातील सर्व चुकीच्या भावना, नकारात्मक विचार एकत्र केल्यावर होतो. एखाद्याचे चांगले अनुभव, चांगली वागणूक, त्याच्या व्यक्तिमत्त्वामधील योग्य पैलू याचा साठा वेगळा ठेवावा. त्याच व्यक्तिशी काही बिनसलं, खटकलं तर ती कटुता, तो वाईटपणा, तो गैरसमज या चांगुलपणाच्या साठ्यात अजिबात एकत्र करू नये. कोणतीही व्यक्ती पूर्ण चूक किंवा पूर्ण बरोबर कधीच नसते. पण आपण त्याला किंवा त्याच्या कृतीला चूक आणि बरोबर ही दोनच संबोधनं देऊन मोकळे होतो. चूक आणि बरोबरच्या मध्ये खरं आणि खोटं यांच्यामध्ये खूप मोठे अंतर असते. कोणतंही नातं, ओळख, संबंध टिकवताना ऐका व्यक्तीत दहापैकी नऊ चुकीच्या गोष्टी जरी असतील तरी त्यातील एक सकारात्मक गोष्ट पाहणे, त्या आनुषंगाने त्याच्याशी वागणे याला आयुष्य समजणं आणि जगता येणं असं म्हणता येईल. एखाद्या चुकीच्या गोष्टींवरून, सवयींवरून कोणालाही पार शून्य आणि वाईटात वाईट जाहीर न करता त्या व्यक्तीबाबत, त्याच्याशी आपल्या वागणुकीबद्दल, आपल्या बुद्धी आणि मनाचा ताळमेळ आपल्याला घालता येणे आवश्यक असते. आपल्या संपर्कात अनेक व्यक्ती असतात, असंख्य लोकांशी आपला संबंध येत असतो. जर प्रत्येक व्यक्तीशी असलेला एक एक मतभेद, एक एक वाईट विचार आपण ताणून धरला तर आपल्याच मनात आणि डोक्यात किती नकारात्मक कचरा जमा होईल आणि त्याचा आपल्याला स्वतःला किती त्रास होईल याची जाणीव आपल्याला असणे आवश्यक आहे. आपल्या संपर्कातील प्रत्येकाच्या फक्त चुका, चुकीचे अनुभव हेच आपण संग्रही ठेवले तर त्याचा परिणाम आपल्या मनात सगळ्यांबद्दलच्या फक्त चुकाच साठवल्या जातील. आपल्याला स्वतःला फक्त लोकांच्या चुकांचं ओझं बाळगत बसावं लागेल, तेच लक्षात ठेवावं लागेल.उलटपक्षी सर्व लोकांचे फक्त चांगले गुण, चांगली वागणूक, हसून-खेळून राहण्याचे प्रसंग, सकारात्मक संभाषण, चांगले विचार, प्रत्येकातील एक जरी चांगली गोष्ट आपण मनात आणि डोक्यात साठवली तर आपण किती चांगल्या गोष्टींचा साठा आपल्याकडे करू शकतो आणि त्यातून आपल्याला किती चांगली ऊर्जा मिळू शकते, आपला स्वभाव किती निर्मळ होऊ शकतो, आपण किती आनंदी राहू शकतो यावर विचार करणे अपेक्षित आहे.

आपल्याशी संबंधित प्रत्येक व्यक्तीने जर आपल्याबद्दल फक्त चुकीचं वागणंच लक्षात ठेवायचे ठरवले आणि आपल्याला त्यांच्याकडून तसाच प्रतिसाद मिळत गेला तर आपण एकटे पडणार, एकाकी होणार हे निश्चित. चूक- बरोबर, चांगलं-वाईट, खरं-खोटं, तुझं-माझं याही पलीकडे विचारांची कक्षा खूप मोठ्या प्रमाणात रुंदावणे, उथळ, वैचारिक पातळी सोडून अतिशय अचूक विश्लेषण करता येणे आपल्याला आवश्यक आहे. हे जर आपल्याला जमत नसेल तर किमान चुकीचे वागणे आपल्याकडून होणार नाही याची काळजी घेणे अपेक्षित आहे. आपल्या मनात, डोक्यात, स्मरणात ठरावीक चांगल्या गोष्टींनाच जागा असणे आवश्यक आहे. जसं कपडे, अन्नपदार्थ, वापरायची कोणतीही वस्तू घेताना आपण निवडून चांगलीच वस्तू घेतो, तसेच कोणाबद्दल, कोणाकडून काहीही घेताना चांगलंच घेणं, चांगलंच लक्षात ठेवणं, वाईट घटना त्याच ठिकाणी विसरून अंतरमन तिथेच साफ करणं, डोक्यातील राग, द्वेष, मत्सर ताबडतोब त्यागून देणं आपल्याला जमवाव लागेल. आपल्याला कोणी अपशब्द बोललं, आपली निंदा केली तरीही ते आपण घेतलंच नाही, प्रतिक्रिया दिलीच नाही तर ते तसंच देणाऱ्याकडे परत जात हा सिद्धांत आपण अमलात आणावा.

– मीनाक्षी जगदाळे

सगुण-निर्गुण

# तीर्थक्षेत्राचे महत्त्व का?

मी पुन्हा सांगते की देवदर्शन करायला एखाद्या मंदिरात किंवा तीर्थक्षेत्री जाणे याचा अजिबात विरोध नाही किंवा ते करू नये, असे पण नाही. जेव्हा मी आमच्या स्वाध्यायाच्या कामासाठी बाहेरगावी असते तेव्हा मी पण जाते अशा पवित्र ठिकाणी. मी आत्ता नुकतीच नाशिकच्या काळाराम मंदिरात गेले होते, तिथली रामाची मूर्ती आपल्या हृदयावर हात ठेवून उभी आहे. मला तेव्हा वाटून गेले की राम आपल्याला सांगतोय, मी मंदिरात तर आहेच पण इथे तुमच्या हृदयात पण मी आहे. जसं इथे काळारामाला दर्शनाला येतोस तसंच मी तुझ्याबरोबर आहे, तुझ्या हृदयात बसलोय हे विसरू नकोस. प्रश्न हा आहे की आपल्या ऋषींनी जेव्हा तीर्थयात्रा हे एक सांस्कृतिक साधन म्हणून दिले, पूर्वी तीर्थयात्रा करून आलेल्याला जेव्हा पूज्यत्व दिले जात असे; ते फक्त पर्यटनाला म्हणून गेलेल्या माणसासाठी असेल का हो? अर्थात मी तीर्थक्षेत्री जाणाऱ्या कुणाचीही मस्करी करत नाही. इतर कुठल्याही ठिकाणी जाण्यापेक्षा तीर्थक्षेत्री



जाणे केव्हाही चांगले. पण तरीही आपण हा विचार केलाच पाहिजे ना की जर ईश्वर सर्वत्र असेल, चराचरात असेल तर मग तीर्थक्षेत्री जाऊन फक्त दर्शन घेणे इतकीच मर्यादित तीर्थयात्रा असेल का हो? आमचे दादा नेहमी म्हणायचे की एखादे क्षेत्र एखाद्या कर्मयोग्याच्या कर्तृत्वामुळे, त्याने तिथे केलेल्या रचनात्मक कार्यामुळे तीर्थक्षेत्र म्हणून नावारूपास येते.काशी मरणान्मुक्तिः' असे लोकांना का वाटत होते? कारण काशीचे लोक तेव्हा हजारो लोकांत जाऊन भगवंताचे विचार, जीवनस्पर्शी विचार समजावण्याकरता अखंड फिरत होते. निरपेक्ष कर्मयोग करत होते. त्यावेळी लोकांना वाटले ज्या वाराणसीतून इतके लोक प्रेरणा घेऊन आमच्यापर्यंत येतात, आम्हाला तेजस्वी विचार देतात, ती वाराणसी किती पवित्र असेल?'

जनमानस

# कविसंमेलनाचे फड गाजवणारे कवि : प्रदीप चौबे

१२ एप्रिल, आपल्या विनोदी काव्यरचनांनी रसिकांना रिझविणारे हिंदी हास्यकवी प्रदीप चौबे यांचा चौथा स्मृतिदिन. चार वर्षापूर्वी १२ एप्रिलला चौबे यांचे दिर्घ आजाराने वयाच्या ७१ व्या वर्षी ग्वालियर येथे निधन झाले होते. २६ ऑगस्ट १९४९ ला महाराष्ट्रातील चंद्रपूर येथे जन्मलेल्या आणि नंतर ग्वालियर येथे वास्तव्यास असलेले प्रदीप चौबे अखिल भारतीय हिंदी कविसंमेलनाचे बेताज बादशहा होते. व्यंगकार, कवि आणि गीतकार प्रदीप चौबे आपल्या हास्य कवितांना नेहमीच टीकात्मकतेची जोड देऊन तत्कालीन परिस्थितीवर व्यंगात्मक भाष्य करायचे. हिंदी हास्य कविसंमेलनांचा फड गाजवणारे कवी प्रदीप चौबेंना चाहत्यांचे अलोट प्रेम लाभले होते. ते काव्य मैफिलीत नेहमीच हास्याची कारंजी उडवत असत. त्यांच्याशिवाय कोणतेही कविसंमेलन अपूर्ण वाटत असे. त्यांच्या निकटवर्तीयांच्या मते, जेवढे ते लोकांना हसवायचे तेवढेच ते आतून दु:खी होते. त्यांना कर्करोगाने ग्रासले होते. जेव्हा ते आपल्या रचना सादर करायचे तेव्हा सभागृहात हास्याचे फवारे उडत. ते आपल्या हास्यकवितांमधून परंपरावादी मानसिकतेवर प्रहार करीत. त्यांच्या रचना आणि सादरीकरणाच्या खास लकबीने श्रोत्यांची हसून हसून मुरकुंडी वळत असे. ते अखंड हास्याचा स्त्रोत होते. त्यांना कवी संमेलनामध्ये हास्याचा छोटा सिलेंडर' संबोधले



जायचे. तथापि, व्यस्ततेमुळे स्वेच्छानिवृत्ती घेणारे चौबे आपल्या नोकरीवरही हास्य-व्यंग करीत. जेव्हा त्यांना नोकरी कुठे करता' असे कुणी विचारले तर ते म्हणायचे देना बँक में, वहां देना ही देना होता है। त्यांचा प्रतिगीत (पैरोडी) हा काव्यप्रकार आणि व्यवस्थेवर प्रहार करणाऱ्या रचना फारच लोकप्रिय ठरल्या. त्यांनी दूरचित्रवाहिनी वरील द कपिल शर्मा शो' मध्ये उपस्थित राहून आपल्या खास शैलीने प्रेक्षकांना खळखळून हसायला लावले होते. यानिमित्ताने त्यांच्या बाबतीत जिन्हें कभी हंसाया था, उन सभी को रुला गए' एवढेच म्हणता येईल.

– प्रा.विजय कोष्टी


वैचारिक

# आमचं आम्ही पाहून घेऊ, आम्हाला कोणाची गरज नाही!

अनेकदा अनेक ठिकाणी हे वाक्य आपण ऐकत असतो, आमचं आम्ही पाहून घेऊ, आम्हाला कोणाचीच गरज नाही, आम्ही खंबीर आहोत, आम्ही भक्कम आहोत तुमचा-आमचा संबंध नाही, तुमच्यावाचून आमचं काही अडणार नाही, आम्ही समर्थ आहोत आमचं बघायला, आम्हाला कोणाच्या सहानुभूतीची गरज नाही. किती प्रचंड अहंकार, किती फाजील आत्मविश्वास, किती टोकाची नफरत, दुस्वास या वाक्यामध्ये ठासून भरला आहे हे बोलणाऱ्याला माहिती नसते का? किती तिरस्कार करू शकतात माणसं एकमेकांचा? का आणि कशासाठी? सगळं जग इतकं सुंदर आहे, सगळी माणसं चांगली आहेत, फक्त त्यांच्यातला चांगुलपणा ओळखण्याची आपली दानत नाही, पात्रता नाही. अनेकांना तरी हेही समजत नाही की, कोणाच्या आयुष्यात कधी काय घडेल, याचा भरवसा नाही. कोण कधी आपल्यातून कायमचा निघून जाईल, हे सांगता येत नाही. तरी देखील एकमेकांना तोडून, संबंध खराब करून लोकांना कसा आनंद मिळतोय? सतत तुम्ही तुमचं, आम्ही आमचं या कृतघ्न विचारसरणीवर कसं आयुष्य जगता येतं हे अशा लोकांनाच ठाऊक! सतत इतरांबद्दल मनात संशय, राग, चीड, दूषित दृष्टिकोन आणि द्वेष अशा माणसांमध्ये ठासून भरलेला असतो.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे, माणसाला माणसच लागतात. सगळा समाज, गोतावळा, मित्र-मैत्रिणी, शेजारी, ओळखीचे, सहकारी, नात्यातले, घरातले, सख्खे-सावत्र, बाहेरचे प्रत्येक जण आपल्या आयुष्यात खूप महत्त्वाचा असतो. सगळ्यांसोबत राहणाऱ्या, सगळ्यांना आपलंस करणाऱ्या, कोणताही राग मनात न ठेवता सगळ्यांमध्ये मनमोकळे बोलणारा, हसणारा, वेळी-अवेळी मदतीला धावणारा कोणीतरी प्रत्येकाला हवा असतो, दोन जण असतील त्यात तिसरा आला, तर तो एखादी उणीव भरून काढतो. चार जण एकत्र असतील, तरी पाचवा जीवाला जीव देणारा असला की, अजून सुरक्षित वाटते.

प्रत्येकापासून मिळणारा आधार वेगळा, मदत वेगळी, मार्गदर्शन वेगळे, प्रत्येकाशी बोलल्यावर मिळणारा धीर, मायेची ऊब वेगळी. प्रत्येकाकडून शिकण्यासारखे खूप काही वेगळे, अनुभवण्यासारखे खूप वेगळे. प्रत्येकाचे आपल्या आयुष्यातील स्थान अतिशय महत्त्वाचे! आपल्याशी संबंधित प्रत्येकाला आपल्यासाठी आपल्या आयुष्यात दिलेली भूमिका वेगवेगळी, कर्तव्य वेगवेगळे, जबाबदाऱ्या वेगळ्या त्यामुळे आपल्याला माणसं लागतातच आणि ती हवीच. आपण आपले, आपल्या भोवतालचे



वर्तुळ जितके छोटे ठेवू, तितकं आपण संकुचित विचारसरणीचे राहणार. जितके आपण स्वतःला आकसून घेऊ, आपल्यापुरतं पाहू तितकं आपण बुरसटलेले, खुजे आणि तोकडेच राहणार. आपण जितकं इतरांचं ऐकायला, इतरांना समजावून घ्यायला, व्यापक दृष्टिकोन स्वीकारायला नकार देऊ तितकंच आपली प्रगती खुंटत राहणार. आपल्याला जन्मजात लाभलेली नाती, आपण जमावलेली नाती, नव्याने निर्माण होत जाणारी नाती, ओळख सगळ्यांची एकमेकांना गरज असते, काहीतरी एकमेकांप्रति कर्तव्य असते, काहीतरी घेणं-देणं असतं, ऋणानुबंध असतो म्हणून सगळे जोडलेले असतात. वास्तविक दैवाने, नशिबाने जोडलेले नातेसंबंध, एकत्र आणलेली माणसं आपल्या अहंकारामुळे तोडण्याचा आपल्याला हक्क नसतो. तसे केल्याने अनेक चुकीचे वाईट प्रसंग आपल्यावर ओढवू शकतात. गैरसमज ठेवून, चुकीच्या कल्पना डोक्यात घालून, चुकीच्या लोकांचं ऐकून आपण आपली माणसं स्वतः लांब करतो, तोडतो, एकमेकांना सोडतो, वेगळे होतो, अलिप्त होतो.

फक्त आपलं पाहण्याचा प्रयत्न करतो, आपल्याला कोणाचीच गरज नाही, आपण किती स्वावलंबी आहोत, कोणावर अवलंबून नाही, कोणाला बांधील नाही, कोणाची गरज नाही, कोणाचं ऐकून घ्यायचं नाही, कोणाशी पटवून घ्यायचं नाही, इतरांना झटकून टाकायचं, झिडकारून टाकायचं असं वागणं सुरू होतं. आपण जर असं वागत असू, तर आपण माणूसच नाही हे पहिले लक्षण आपण लक्षात घ्यावं. जनावर सुद्धा कळप करून एकत्र राहतात पण माणसं मात्र वेगळी होण्यात धन्यता मानतात.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि.१३ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १९४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## सोन्यासाठी स्मशानातील राख गेली चोरीला

**पंढरपूर** : पंढरपुरातील एका वयोवृद्ध महिलेचे सोमवारी निधन झाले होते. त्यांच्यावर त्याच दिवशी हिंदु स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आले होते. तिसऱ्या दिवशी राख सावडण्याच्या कार्यक्रमासाठी संबंधित नातेवाईक गेले, मात्र त्या ठिकाणी मयत व्यक्तींची राख चोरीला गेली असल्याचे निदर्शनास आले.

पंढरपुरातील उप नगरातील मंगळवेढे नगर परिसरातील रखमाबाई गेना देवकर (वय ९५) यांचे सोमवारी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर सोमवारी अंत्यविधी करण्यात आले. यावेळी त्यांच्या अंगावर अंदाजे एक तोळे सोने होते.

अंत्यविधीचा कार्यक्रम उरकल्यानंतर नातेवाईक आपआपल्या घरी गेले. बुधवारी सकाळी सातच्या आसपास राख सावडण्याच्या कार्यक्रमासाठी पुन्हा देवकर यांचे नातेवाईक स्मशान भूमीत एकत्र आले. मात्र अंतविधी झालेल्या ठिकाणी मयत व्यक्तीची राख आढळून आली नाही. यामुळे दत्ता देवकर, दगडूशेठ घोडके, किरण पवार, महेश धोत्रे, सुधाकर चौगुले, शंकर पवार, मारुती शिंदे, दीपक चव्हाण, राजू जगदाळे, महेश चव्हाण, अण्णा जाधव, दत्ता शिंदे व समाजातील मंडळींनी याबाबत पोलिसांकडे जाऊन तोंडी तक्रार केला आहे.

## कर्नाटकातील व्यक्तीचा खून करून मृतदेह अर्धवट जाळला

### मैंदर्गी शिवारातील घटना

**सुराज्य/अक्कलकोट**



मैंदर्गी शिवारात अक्कलकोट-गाणगापूर रोडवर एका ३४ वर्षीय पुरुषाचा खून करून त्याचे प्रेत अर्धवट जाळून गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. चंदाप्पा धर्माण्णा कांबळे (वय ३४ वर्षे, रा. आंबेवाड ता.आळंद जि. गुलबर्गा) असे खून झालेल्या व्यक्तिचे नांव आहे.

अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यामध्ये याची नोंद झाली आहे. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार , लक्ष्मण लिंगदळी (रा. मैंदर्गी) यांच्या शेती (गट नं २७६) लगत असलेल्या अक्कलकोट ते दुधनी जाणाऱ्या रोडच्या बाजूस असलेल्या चारीमध्ये एक पुरुष जातीचे प्रेत अर्धवट जळालेल्या अवस्थेत पडल्याचे माहिती मिळाली. त्यामुळे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्यासोबत हवालदार भोसले, पोलीस नाईक मियावाले, राठोड, कोरे, कॉन्स्टेबल जवळगे यांचे पथक घटनास्थळी गेले. मृताच्या खिशामध्ये सापडलेल्या कागदपत्रांवरून त्याची ओळखी पटली. त्यावरून पोलिसांनी आंबेवाड (ता. आळंद) येथील गुरप्पा धर्मण्णा कांबळे यांना फोन करून मृताची चौकशी केली असता मृताचे नाव चंदाप्पा धर्माण्णा कांबळे (वय ३४, रा. आंबेवाड, ता. आळंद) असे असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द भा.दं.वि. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सरकारची कामे सांगा, सरकारला कामाला लावू नका


## बाबरीवरून अमित शहांनी दिली चंद्रकांतदादांना तंबी

**सुराज्य/नवी दिल्ली**

वादग्रस्त विधाने टाळा. अशी विधाने खपवून घेतली जाणार नाहीत. लोकसभा निवडणुका तोंडावर आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगिरीवर बोला,सरकारची कामे लोकांना सांगा, सरकारलाच कामाला लावू नका, अशी तंबी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चंद्रकांत पाटील यांना दिली असल्याचे भाजपमधूनच बोलले जात आहे.

'बाबरी मशिदी पाडताना शिवसेना प्रमुख किंवा शिवसैनिक नव्हते' असे विधान चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच केले होते.त्यावरून चंद्रकांत पाटील यांच्यावर जोरदार टीका होऊ लागली आहे.

उद्धव ठाकरे यांनी तर राजीनाम्याची मागणीच केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चंद्रकांत पाटलांना खुलासा करण्याची सूचना दिली. भाजप प्रदेशाध्यक्षांनीही ते चंद्रकांत पाटलांचे वैयक्तिक मत असल्याचे सांगून हात वर केले.



या पार्श्वभूमीवर मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी नुकतीच भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीत शहा यांनी चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येत आहे. कोणीही वादग्रस्त विधाने करू नयेत, अशी विधाने खपवून घेतली जाणार नाहीत, अशा शब्दात गृहमंत्री अमित शहा यांनी पाटील यांना तंबी दिल्याची चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान,माझ्या मनात बाळासाहेबांबद्दल आदर आहे. बाबरी मशीद पाडताना, सगळे हिंदू होते. आनंद दिघे यांनी अयोध्या मंदिर होण्यासाठी सोन्याची वीट पाठवली होती. बाळासाहेब ठाकरे यांनी श्रेय घेतलेच होते. चुकूनही बाळासाहेब ठाकरेंबद्दल अनादर व्यक्त करण्याचा मुद्दा नाही, असे स्पष्टीकरण चंद्रकांत पाटील दिले आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सगळ्याच समस्येवर उपाय!!!

| कल्याण |
|---|
| 248-42-679 |

| मेन बाजार |
|---|
| ---- |

## नागणसूरच्या शिवाचार्य महास्वामींविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

**सुराज्य/अक्कलकोट**

शिक्षक म्हणून नोकरी लावण्यासाठी २८ लाख रूपये घेऊन नोकरीस न घेता फसवणूक केल्याबद्दल नागणसूर (ता. अक्कलकोट) येथील सीतामाता ज. शेळके प्रशालेचे चेअरमन श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी यांच्या विरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला.

तक्रारदार शांतवीर शरणप्पा कळसगोंडा (वय ३२, रा.नागसूर, ता. अक्कलकोट) यांचे एमए बीएड शिक्षण झाले असून त्यांच्या परिचयाचे सीतामाता शेळके प्रशालेचे शिक्षक राम सोलापुरे यांनी कळसगोंडा यांना सीतामाता शाळेत नोकरीस लावतो म्हणून शिवाचार्य महास्वामी यांची भेट घडवून आणली. भेटीत स्वामींनी कळसगोंडा यांना २८ लाख रु.द्यायचे असे सांगितले.शांतवीर यांच्या वडिलांनी कसलाही विचार न करता मुलासाठी आपली ५ एकर जमीन विकायचा निर्णय घेतला. जमीन विकून ठरलेल्या रकमेप्रमाणे शांतवीर यांनी त्यांचे वडील शरणप्पा व त्यांचे इतर मित्रांसमवेत जाऊन पैसे दिले.

वेळोवेळी स्वामी यांना भेटून नोकरीबाबत विचारणा केली असता स्वामी यांनी फिर्यादीस आजतगायत नोकरीही दिली नाही व घेतलेली रक्कम (अठ्ठावीस लाख रूपये) ही दिली नाही. याप्रकरणी अध्यक्ष श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी यांच्या विरूध्द अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल झाला.अधिक तपास पोलीस निरीक्षक महेश स्वामी हे करीत आहेत.



> तक्रार राजकीय सूडबुद्धीने केलेली आहे. सध्या मी परगांवी आहे. फिर्यादीकडून मी एक पैसाही घेतला नाही.
>
> **–श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी नागणसूर**

## चिमणीचा निर्णय योग्य वेळी मीच घेणार : आयुक्त

**सुराज्य/सोलापूर**

श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या चिमणीची अंतिम सुनावणी झालेली आहे. याचा निर्णय योग्य वेळी मीच घेणार आहे. डीजीसीएए आणि महापालिका स्वतंत्र संस्था आहेत. ते मला आदेश देऊ शकत नाहीत. डिजीसीए ने महापालिकेला कोणत्याही प्रकारे काहीही कळवले नाही, असे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी सांगितले.

चिमणी प्रकरणावर मंगळवारी सिद्धेश्वर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी पत्रकार परिषद घेत महापालिका आयुक्त चिमणीचा निर्णय देऊ शकत नाही. डीजीसीएचा सर्वे पुन्हा एकदा होणार आहे. त्याचा अहवाल झाल्यावरच निर्णय होणार असल्याचे सांगितले होते. त्या संदर्भात महापालिका आयुक्तांना विचारले असता त्यांनी हे स्पष्टीकरण दिले.



महापालिका आयुक्त शितल तेली - उगले म्हणाले की, डीजीसीए आणि महापालिका ही स्वतंत्र संस्था आहे. त्यांचा आणि महापालिकेचा काहीही संबंध नाही. ते मला कोणताही आदेश देऊ शकत नाही. चिमणीची अंतिम सुनावणी माझ्यासमोरच झाली आहे आणि त्याचा निर्णय मी योग्यवेळी देणार आहे. नुकत्याच झालेल्या बैठकित पालकमंत्र्यांनी जे सांगितले आहे. ते सर्वांना माहितीच आहे. त्यानुसार लवकरच निर्णय होईल असे सांगत महापालिका आयुक्तांनी नेमका चिमणीचा निर्णय कधी देणार हे मात्र स्पष्ट सांगितले नाही.

## सोलापूर स्मार्ट सिटी संचालक मंडळाची आज बैठक

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर स्मार्ट सिटी संचालक मंडळाची गुरुवारी बैठक होणार आहे. अशी माहिती सीईओ शितल तेली उगले यांनी दिली. ही बैठक दुहेरी जलवाहिनीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवारी होणार आहे. या बैठकित विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामासंदर्भात जुना मक्तेदार असलेल्या पोचमपाड कंपनीने लवादात धाव घेतली आहे. दरम्यान, याप्रकरणी तडजोडीने निर्णय घेण्यात येणार आहे. तडजोडी संदर्भातील नियम, शर्ती व अटी या संदर्भातला प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. यावरही या बैठकित निर्णय घेण्यात येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यानंतर हा तडजोडीचा प्रस्ताव लवादाकडे सादर करण्यात येईल आणि त्यानंतर लवाद पुढील कार्यवाही करणार आहे, असे बोलले जात आहे. त्यामुळे ही बैठक दुहेरी जलवाहिनीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.












| दिनांक | सकाळी किर्तनकार | दुपारी किर्तनकार | सायंकाळी किर्तनकार |
|---|---|---|---|
| गुरूवार १३/०४/२०२३ | ह.भ.प.माणिक महाराज रेंगे (दुपारी १ ते दुपारी ३) | ह.भ.प.संगिताताई चोपडे (दुपारी ३ ते सायं ६) | ह.भ.प.बापुसाहेब महाराज देहुकर (सायं ७ ते संध्या १०) |
| शुक्रवार १४/०४/२०२३ | ह.भ.प.रणजित महाराज शिंदे,धर्मपुरी (सकाळी १० ते दुपारी १) | | ह.भ.प.नवनाथ महाराज मेशरे (सायं ७ ते संध्या १०) |
| शनिवार १५/०४/२०२३ | ह.भ.प.माऊली महाराज खडकवाडीकर (सकाळी १० ते दुपारी १) | ह.भ.प.ज्ञानेश्वरीताई डांगे (दुपारी ३ ते सायं ६) | ह.भ.प.महादेव महाराज शेंडे (भारूड) (सायं ७ ते संध्या १०) |
| रविवार १६/०४/२०२३ | ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज तांबे (सकाळी १० ते दुपारी १) | ह.भ.प.छगन महाराज खडके दुपारी १ ते दुपारी ३ | ह.भ.प.नरेंद्र महाराज गुरव सायं ६ ते संध्या ९ |
| सोमवार १७/०४/२०२३ | ह.भ.प.कल्याण महाराज काळे (सकाळी १० ते दुपारी १) | ह.भ.प.स्वामिनीताई भुसारे (दुपारी ३ ते सायं ६) | ह.भ.प.संतोष महाराज ढाणे (सायं ७ ते संध्या १०) |

स्थळ :- श्री दत्त मंदिर, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.गंगामाईनगर,पो.पिंपळनेर, ता.माढा जि.सोलापूर

सौजन्य : सिमेंट व बांधकाम साहित्य पुरवठ्यात अग्रेसर नाव : साई सेल्स् कॉर्पोरेशन, माढा





## बचेरीला नीरा देवघरचे पाणी द्या; खा.नाईक-निंबाळकरांना ग्रामस्थांचे निवेदन

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील दुष्काळी बचेरी गावच्या शेतीला निरा देवघर प्रकल्पाचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी ग्रामस्थांनी आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकला आहे.याबाबतचे निवेदन दि माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना देण्यात आले.खासदार निंबाळकर यांनी निवेदन स्वीकारून याबाबत ग्रामस्थांसोबत समाधानकारक चर्चा केली.बचेरी गावच्या वर्षानुवर्षे असलेल्या पाणी टंचाईचा पाढाच यावेळी वाचला.बचेरी गावात पिण्यासाठी सुध्दा पाणी नाही , शासन टँकर ची व्यवस्था करण्यात दिरंगाई करत आहे असे ग्रामस्थांनी सांगितले .बचेरी गावच्या व्यथा ऐकून घेतल्यावर खासदार निंबाळकर यांनी माळशिरस तालुक्यातील बचेरी सह वंचित सर्व गावांना निरा देवघरचे पाणी मी १००% मिळवून देणार असे आश्वासित केले. निरा देवघर मधील शिल्लक १.६ टीएमसी पाण्यातून बचेरी व इतर गावास पाणी मिळवून देणार असे ठामपणे सांगितले.तसेच निवडणूकांवर बहिष्कार टाकू नका, बहिष्कार मागे घेण्याचे आवाहनही त्यांनी ग्रामस्थांना केले.या प्रसंगी सांगोला चे आ.शहाजी पाटील,भाजप सांगोला तालुका अध्यक्ष चेतनसिंह केदार, बचेरी उपसरपंच मोहन शिकारे, प्रा.सदाशिव शिंदे, माजी सरपंच सोमनाथ गाढवे, मच्छिंद्र थिटे, मधुकर खेडेकर, बिरा शिंदे , वस्ताद माने, सुदाम शिंदे, विश्वजित गोरड, लहु माने, शिवाजी शिंदे, धनाजी शिकारे, संतोष खेडेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.



## पिलीव येथील स्वस्त धान्य दुकानात आनंदाचा शिधा वाटपास सुरुवात


**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील पिलीव विकास सेवा सोसायटीच्या स्वस्त धान्य दुकानात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आनंदाचा शिधा वाटपास विकास सेवा सोसायटीचे चेअरमन संग्राम पाटील, संचालक विठ्ठल मदने सर,नबाजी मदने ,शाप मॅनेजर महेशराव पाटील यांच्या उपस्थितीत सुरुवात करण्यात आली. यामध्ये एक किलो चना डाळ, एक किलो रवा,एक किलो साखर, एक लीटर पामतेल या वस्तूंचा आनंदाचा शिधा यामध्ये समावेश आहे. पात्र लाभार्थी यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन शॉप मॅनेजर महेश पाटील यांनी केले आहे.



## 'लोकविकास'मध्ये महात्मा फुले जयंती साजरी

**श्रीपूर** : लोकविकास मराठी मिडियम स्कूल, वेळापूर येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते, सर्पमित्र गोपाळ आबा क्षीरसागर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ज्ञानेश्वर सावंत , साक्षी शेजाळ,अंजली पिसे, स्वराली पिसे यांनी क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले.महात्मा फुले यांच्या जयंती चे औचित्य साधून चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध क्रीडा प्रकारामध्ये ज्या ज्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले अशा विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास लोकविकास मराठी मिडियम स्कूल चे मुख्याध्यापक सुनील पताळे, राया वाघमारे, सिनाप्पा शेंडगे,ऋषिकेश राऊत ,अमोल साठे, विजया चापले, अरुणा बनसोडे, विद्या स्वामी, विद्या येवारे, उषा राऊत आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल साठे यांनी केले.

## नगरसेवक निनाद पटवर्धन यांची भाजप पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजकपदी निवड



**श्रीपूर** : श्रीपूर येथील भारतीय जनता पार्टीचे सदस्य व भारतीय जनता पार्टी ट्रान्सपोर्ट सेल जिल्हाध्यक्ष व महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीचे नगरसेवक निनाद पटवर्धन यांची भाजपच्या पंचायत राज व ग्रामीण विकास विभागाच्या पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजकपदी निवड करण्यात आली आहे. भाजपचे पंचायत राज व ग्रामीण विभाग विकासाचे प्रदेश अध्यक्ष गणेश जगताप यांनी निनाद पटवर्धन यांना निवडीचे पत्र दिले. यावेळी रवी शर्मा व संयोजक समाधान गायकवाड प्रसाद कुलकर्णी हे उपस्थित होते. निनाद पटवर्धन हे सोलापूर जिल्हा संघटन सरचिटणीस भाजपचे धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीपूर परिसरात भाजपचे काम करत आहेत. निनाद पटवर्धन यांच्या निवडीनंतर महाळुंग श्रीपूर परिसरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार मोठ्या प्रमाणावर काम करीत आहे या सर्व योजनांची माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवणे व येणाऱ्या अडी अडचणी सोडवणे हे प्रामुख्याने कामाचे स्वरूप असल्याचे सांगून सर्वांनी योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

# डॉ.आंबेडकर जयंती उत्सव सौहार्दपूर्ण वातावरणात करावा

## जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे

**सुराज्य/पंढरपूर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सव कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसीलदार सुशील बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, पोलीस निरीक्षक अरुण फुगे, मिलिंद पाटील, धनंजय जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश तारू, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत भागवत तसेच सर्व समाजातील विविध नागरिक, पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सरदेशपांडे म्हणाले, जातीय व धार्मिक सलोखा राखण्यासाठी प्रत्येक धर्माचा आदर राखणे आवश्यक असून त्यातूनच समाजातील शांतते बरोबरच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे शक्य होईल. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नसून समाजात अशांतता पसरवण्याबरोबरच तेढ निर्माण करणाऱ्यावर कारवाईसाठी पोलीस प्रशासन तत्पर आहे. सार्वजनिकरीत्या सण उत्सव साजरे करताना वर्गणी जमा करण्यात येते वर्गणी जमा




करण्यावरून अनेक वेळा वाद निर्माण होऊन समाजामध्ये अशांतता निर्माण होण्याचे प्रसंग उद्भवतात त्यामुळे वर्गणी करताना संबंधितांनी कोणावरही जबरदस्ती करू नये अशा सूचनाही जिल्हा पोलीस अधीक्षक सरदेशपांडे यांनी यावेळी दिल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव कालावधीत वीज पुरवठा सुरक्षित राहील याची दक्षता महावितरण विभागाने घ्यावी. तसेच मिरवणुकीच्या दरम्यान विद्युत वाहिनीच्या तारांचा अडथळा होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. मंडळांनी उत्सव साजरा करताना वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. मिरवणुकीच्या कालावधीत पोलीस प्रशासनात मार्फत कडेकोट सुरक्षा व्यवस्था राहणार असून, संपूर्ण मिरवणूक सीसीटीव्ही निगराणीच्या कक्षेत राहणार असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सांगितले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या निमित्ताने शिस्तप्रिय मिरवणूक, रचनात्मक व सामाजिक कार्य करणाऱ्या मंडळास पंढरपूर शहर पोलीस ठाण्याच्या वतीने पुरस्कार देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कालावधीत वाहतूक नियमन, पोलीस बंदोबस्त , मिरवणूक कालावधीत सुसज्ज रुग्णवाहिकेची उपलब्धता, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी सूचना यावेळी बैठकीत पदाधिकारी व नागरिकांनी केल्या.

# कुर्डूवाडीत बहुजन वंचित आघाडीतर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन

**सुराज्य/कुर्डूवाडी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडी कुर्डूवाडी शहरच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शहराध्यक्ष प्रदीप सोनटक्के यांनी दिली.

बहुजन वंचित आघाडीच्या वतीने गुरुवारी दि.१३ रोजी सायंकाळी ५ वाजता निबंध स्पर्धा, महापुरुषांच्या जीवनावर भाषणे रेल्वे कॉलनी पाठीमागील दत्त मंदिर शेजारी, देवकते वस्ती येथे आयोजित करण्यात आले आहे. दि.१३ रोजी रात्री १२ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण व सामूहिक धम्मवंदना होणार आहे.

दि.१४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व सामूहिक धम्मवंदना वंचित बहुजन महिला आघाडीच्या वतीने करण्यात येणार आहे.सकाळी ११ वाजता रांगोळी स्पर्धा (खुला गट), संगीत खुर्ची (लहान मुले, मुली) सायंकाळी ४ वाजता संगीत खुर्ची (लहान मुले मुली) सायंकाळी ५ वाजता लिंबू चमचा (लहान मुले, मुली) सायंकाळी ६ वाजता संगीत खुर्ची (महिलांसाठी) अशा विविध स्पर्धा रेल्वे कॉलनी, पाठीमागील दत्त मंदिराशेजारी, देवकते वस्ती येथे आयोजित करण्यात आले आहेत.

१४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता संबोधी एक्सप्रेस या साप्ताहिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे, करमाळ्याचे आमदार संजय शिंदे, जिल्हाप्रमुख ठाकरे गट धनंजय डीकोळे, माजी नगराध्यक्ष समीर मुलाणी यांच्या हस्ते होणार आहे.

दि.१८ रोजी सायंकाळी ६ वाजता आमदार संजय शिंदे, धनंजय डिकोळे, नितीन पवार, लखन जानराव यांच्या उपस्थितीत, अजिंक्य चांदणे यांचे प्रबोधनपर व्याख्यान होणार असून या कार्यक्रमासाठी रेल्वे संघटनेचे अध्यक्ष बी.जे. सुरवसे उपस्थित राहणार आहेत. तर सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायिका मंजूषा शिंदे यांचे भिमगीतांचा कार्यक्रम कुर्डूवाडी येथील आजाद मैदान (भाजी मंडई) येथे होणार आहे. सामाजिक उपक्रमासाठी मोहन लोंढे, सुरज अस्वरे, रोहित कांबळे, खंडू धायगुडे, ओंकार टोळके, ओंकार पवार, अशपाक तवकल,अमन कांबळे, दिगंबर माने, कृष्ण हजारे, गणेश शिंदे, किशोर साळवे आदी परिश्रम घेणार आहेत.



## निसर्गाशी एकरूप एमआयटी विश्वज्योती

### 'इंटरनॅशनल स्कूल' शाळेचा अनोखा उपक्रम

**सुराज्य/सोलापूर**

संशोधन, क्रीडा, संस्कृती आणि नवनिर्मितीचा मुख्य धागा पकडून विद्यार्थ्यांना संस्कारयुक्त अध्ययन देण्यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून निसर्गाशी एकरूप असलेली एमआयटी विश्वज्योती इंटरनॅशनल स्कूल' सज्ज झाली आहे.

एमआयटीतर्फे मीरा भाईंदर व ठाणे येथील नागरिकांच्या पाल्यांसाठी १४ एकर परिसरात शिक्षणाची नवी परिभाषा घेऊन आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण दिले जाणार आहे.

या शाळेच्या उद्घाटन प्रसंगी मीरा भाईंदरच्या महापौर ज्योत्स्ना हसनाळे म्हणाल्या,परिसरात अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी शाळा उघडल्यामुळे आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा सर्व स्तरावर विकास होईल. अध्यात्म आणि शिक्षणाची सांगड घालून विद्यार्थ्यांचा मानसिक व भौतिक विकास साधला जाणार आहे. त्यांना निसर्गाशी एकरूप होण्याबरोबरच आधुनिक ज्ञान दिले जाणार आहे. हे माझ्या मतदार संघात असल्याचा मला अभिमान आहे.

युनेस्को अध्यासन प्रमुख व माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, अशा भागात अत्याधुनिक शाळा सुरू केल्यामुळे येथे सर्व स्तरावर विकास होईल. येथे विद्यार्थ्यांचे संस्कारयुक्त अध्ययनाबरोबरच उत्तम चरित्र निर्मितीवर भर दिला जाणार आहे. शाळेच्या माध्यमातून विवेकवादी विद्यार्थी घडविले जातील. अध्यात्म व विज्ञानाची कास धरून येथील विद्यार्थी विश्वशांतीसाठी कार्य करेल.

या शाळेच्या उद्घाटन प्रसंगी मीरा भाईंदर मनपा आयुक्त दिलीप ढोले, अॅड. नितीन कारवरकर, सुरेश पाटील उपस्थित होते. तसेच, महाराष्ट्र चित्रपट मंच आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश ढाकणे, माईर्स एमआयटी पुणेचे व्यवस्थापकीय विश्वस्त व कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, माईर्स एमआयटीचे विश्वसत व अध्यक्ष डॉ. मंगेश तू. कराड, सुनिता कराड, माईर्स एमआयटीच्या कार्यकारी संचालिका ज्योती कराड ढाकणे, डॉ. अदिती कराड, प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, अण्णासाहेब टेकाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रद्धा देसाई व ज्यू. कॉलेजचे मुख्याध्यापक प्रमोद पाटील उपस्थित होते.



## उत्तर सोलापूर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळावे : पौळ

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

उत्तर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका उत्तर सोलापूरच्या वतीने उप जिल्हा प्रमुख विक्रांत काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत,, उत्तर तालुका प्रमुख संजय पोळ यांनी जिल्हा अधिकारी मिलिंद शंभरकर यांना निवेदन देण्यात आले.

ज्या शेतकऱ्यांनी कांदा पिकवला बाजार समिती मध्ये नेहून विक्री केला पण त्याची सातबारा वर पीक पाण्याची नोंद नाही, कांदा पिकवला पण महाराष्ट्राबाहेरील बाजार समिती मध्ये विकला अशा शेतकऱ्यांना अनुदान तुन वगळणाची घोषणा शासनाने केली. ज्या नावाने सातबारा उत्तरा आहे त्याच नावाने कांदा विक्री केलेली पावती आहे. त्याच नावाच्या बँक खात्यामध्ये अनुदान जमा करावयाचे आहे.

फक्त पीकपाणी नोंद नाही कांदा महाराष्ट्रा बाहेर विक्री केला म्हणून अनुदानातून जाणीवपूर्वक शेतकऱ्याला वंचित ठेवण्याचं काम हे शासन करत आहे .पीक पाणी नोंद गाव कामगार तलाठी यांनी करायचे आहे की शेतकऱ्यांनी करायचे आहे तर त्या शेतकऱ्यांना शासनाने प्रशिक्षण दिले नाही आणि सर्व शेतकऱ्याकडे स्मार्टफोन आहेत असे नाही, महाराष्ट्रा बाहेर कांदा विकणाऱ्या शेतकऱ्यांना आशा जाचक अटी रद्द नाही केल्यास , अनुदानपासून वंचित ठेवल्यास शिवसेना उत्तरं तालुका सोलापूर च्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

यावेळी उपतालुका प्रमुख अच्युतराव बाभळे, सचिन घोडके , महिला आघाडी तालुका अध्यक्ष पारिणीता शिंदे, अकोलेकाटी चे माजी सरपंच राजू घाटे, माजी सभापती धनंजय लामकाने, उपविभाग प्रमुख अरुण लोंढे, पांडुरंग मळगे, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत चव्हाण, शाखाप्रमुख महेंद्र डोंबाळे, पांडुरंग कापसे उपस्थित होते.

## बोंडलेत आनंदाचा शिधा वाटप

**श्रीपूर** : बोंडले ता. माळशिरस येथील स्वस्त धान्य रेशन दुकानातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३२ व्या जयंती निमित्त आनंदाचा शिदाचे बोंडले येथे बोंडले सरपंच विजयसिंह देशमुख व माजी उपसरपंच महेंद्र लोंढे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते आंनदाचा शिधा वाटप करण्यात आला.

# श्रीक्षेत्र मार्डी येथील यमाई देवीच्या यात्रेला आजपासून सुरुवात

## पोलीस बंदोबस्त मिळावा,भारनियमन न करण्याची मागणी

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

उत्तर तालुक्यातील मार्डी येथील श्रीक्षेत्र यमाई देवीची यात्रा सालाबाद प्रमाणे चैत्र वाद्य अष्टमी गुरुवार दिनांक १३ पासून ते १७ एप्रिल २०२३ रोजी होणार आहे.यात्रा कालावधीत दैनिक महापूजा,मानाच्या काट्याच्या मिरवणूक, छबिना,पालखी,आराधी गाणे,जागरण असे विविध धार्मिक, सांस्कृतिक व पारंपरिक कार्यक्रम आयोजित केले जात आहे.संपूर्ण महाराष्ट्रासह कर्नाटक,आंध्र प्रदेश येथील भाविक मोठ्या प्रमाणात येतात .भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून



यात्रा कालावधीत अखंडित विद्युत पुरवठा करण्यासाठी महा विद्युत वितरण विभाग उपअभियंता, यात्रा कालावधीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून पाच दिवस पोलीस बंदोबस्त देण्यात यावा अशी मागणी यात्रा कमिटीच्या वतीने, मुख्य विश्वस्त पुजारी रंगनाथ गंगाधर गुरव यांनी सोलापूर तालुका पोलीस स्टेशनला निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

यमाई देवस्थान व मारुती देवस्थान ट्रस्ट मार्डी, मार्डी सरपंच, उपसरपंच व सदस्य,यात्रा कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# हरितक्रांतीमुळे झालेले संकरीकरण शेतकऱ्यांच्या मुळावर : कृषिभूषण पडवळे

## गरजेपेक्षा किती तरी जास्त उत्पादनामुळे बाजारात मंदी ; सांगोल्यात ग्रामीण साहित्य संमेलन

**सुराज्य/सोलापूर**

शेतकऱ्यांना मंदीला सतत तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे अलीकडील दहा वर्षापासून हरितक्रांतीमुळे झालेले संकरीकरण शेतकऱ्यांच्या मुळावर उठले असल्याचे मत कृषिभूषण अंकुश पडवळे यांनी व्यक्त केले. सांगोला येथे काल राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनात शेतकऱ्यांचे प्रश्न व साहित्य या विषयावर ते बोलत होते.

यावेळी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव, परिसंवादाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, डॉ. कृष्णा इंगोले, बीडीओ आनंद लोकरे, संवादक प्रा.सिताराम सावंत, प्रा. दत्ता घोलप आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना पडवळे म्हणाले की, शेतकरी अनेक संकटाचा सामना करून गुणवत्तापूर्ण भाजीपाला उत्पादन घेतो केवळ बाजारातील मंदी मुळे ७०% पेक्षा जास्त शेतकरी मागील सहा वर्षापासून तोट्याची शेती करीत आहेत. ही फार गंभीर व चिंताजनक गोष्ट आहे. चाळी-पन्नास वर्षापूर्वी अन्न धान्याचा तुटवडा भासत असल्याने हरितक्रांतीच्या माध्यमातून बियाण्यांचे संकरीकरण करून सर्वच पिकांचे उत्पादन वाढवून त्यावेळची



अन्न धान्याची गरज भरून काढण्यात आली. पण त्यावेळची हरितक्रांती अलीकडील काळात शेतकऱ्यांच्या मुळावर उठली आहे. सर्वच पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले असून गरजे पेक्षा किती तरी जास्त उत्पादन होत आहे.यामुळे ७०% पेक्षा जास्त शेतकरी मागील सहा-सात वर्षा पासून मंदीत शेती करीत आहेत. ही बाबत अतिशय चिंताजन आहे, कारण शेतकरी सर्व संकटाचा सामना करूनही चांगले उत्पादन घेत आहे. अलीकडे शेतीतील सर्वच पिकांचा उत्पादन खर्च ही वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पुढे आर्थिक मोठे संकट उभा राहत आहे.यासाठी शासनाने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना तेजी मंदीतून बाहेर काढण्यासाठी पीक नोंदीची यंत्रणा उभी करण्यासाठी पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे.

यावेळी संमेलन समितीचे प्रमुख दादासाहेब रोंगे, बाबूराव गायकवाड, पाणी प्रश्नाचे अभ्यासक वैजिनाथ धोंगडे, ड उदय धोंगडे, प्रा. प्रशुध्दचंद्र झपके, शिवाजी बंडगर, नागेश बिचुकले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील जंवजाळ यांनी केले.

# गारपीट, अवकाळीनंतर बळीराजापुढे आणखी एका संकटाची शक्यता

## यंदा सरासरीच्या ९४ टक्के पाऊस पडण्याचा 'स्कायमेट'चा अंदाज

**सोलापूर** : मार्च आणि एप्रिल महिन्यात गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकरी संकटात आला आहे. हातात आलेले पीक अवकाळी पावसामुळे गेली आहेत. परंतु आता स्कायमेट या संस्थेने केलेल्या अंदाजामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

'स्कायमेट' ही खाजगी हवामान अंदाज देणाऱ्या संस्था असून गेल्या अनेक वर्षांपासून हवामानाचा अंदाज व्यक्त केला जात आहे.स्कायमेटने आता २०२३ चा मान्सूनचा अंदाज जाहीर केला आहे. स्कायमेटच्या मते, यंदा मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. पहिल्या अंदाजात पाऊस सामान्यपेक्षा कमी असू शकतो. सामान्य पावसाची केवळ २५ टक्के शक्यता आहे. यामुळे यंदा दुष्काळ पडण्याची शक्यता आहे.



दीर्घ कालावधीनंतर सरासरीच्या ९४ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज स्कायमेटने व्यक्त केला आहे. यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा खचऊ आणि स्कायमेट या संस्थांनी वर्तवलेला अंदाज म्हणजे भविष्यातील धोक्याची घंटा आहे. सरकारने याचा गांभीर्याने विचार करून आतापासूनच पीक नियोजन आणि धरणातील पाणी साठ्याचं पिण्यासाठी व शेतीसाठी काटेकोर नियोजन करण्याची गरज आहे.

**का पडणार कमी पाऊस :** अल निनोमुळे मान्सून कमकुवत होण्याची शक्यता आहे. पॅसिफिक महासागरातचा पृष्ठभाग जेव्हा गरम होतो, तेव्हा अल निनोचा परिणाम होतो. याचा परिणाम नैऋत्य मान्सूनवर होतो. अंदाजानुसार, मे-जुलै दरम्यान अल निनोचा प्रभाव परत येऊ शकतो. जून ते सप्टेंबरपर्यंत देशात मान्सूनही पूर्णपणे सक्रिय होतो. स्कायमेटच्या अंदाजानुसार अल निनोमुळे दुष्काळ पडण्याचीही शक्यता आहे.

**महाराष्ट्रात काय परिस्थिती :** एल निनोमुळे यंदा मान्सूनवर कमी होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेशात मान्सून कमी असणार आहे. तर पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये सामान्य सरासरीपेक्षा कमी मान्सून पाऊस पडेल.

**यापूर्वी काय झाले :** १९९७ मध्ये पाऊस सामान्यपेक्षा जास्त होता. त्यावेळीही अल निनोचा प्रभाव होता. एल निनोचा प्रभाव असताना कमी पाऊस पडतो, परंतु १९९७ मध्ये हे खोटे ठरले. तसेच २००४ मध्ये अल निनो कमकुवत असूनही चांगला पाऊस पडला होता.

**अल निनो म्हणजे काय? :** अल निनो हा जलवायू प्रणालीचा एक भाग आहे. हवामानावर त्याचा परिणाम होतो. अल निनोची परिस्थिती साधारणपणे दर तीन ते सहा वर्षांनी उद्भवते. पूर्व आणि मध्य विषुववृत्ताला प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावर पाणी सामान्यापेक्षा गरम होते तेव्हा त्याला अल निनो म्हणतात. एल निनोच्या या परिस्थितीमुळे वाऱ्याची पद्धत बदलते आणि त्यामुळे जगाच्या अनेक भागांमध्ये हवामानावर परिणाम होतो.

**यापुर्वी कधी होता अल निनो :** यापुर्वी २००४, २००९, २०१४ व २०१८ मध्ये अल निनोचा अंदाज होता. या सर्व वर्षांत देशात दुष्काळ पडला. तोच अंदाज २०२३ मध्ये आहे.

शिवाय दुष्काळी परिस्थितीत करावयाच्या कामाचा आराखडाही तयार करावा लागेल. सरकार आणि विरोधी पक्षाने राजकारण आणि परस्परांतील मतभेद विसरून यावर हातात हात घालून काम करावं. जेणेकरून येऊ घातलेल्या संभाव्य संकटाची तीव्रता कमी होईल.



## घोंगडे वस्ती येथे पाणपोईचे उद्घाटन

**सुराज्य/सोलापूर**

चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने घोंगडे वस्ती येथील भाजी मार्केटमध्ये पाणपोई सुरू करण्यात आली. या ठिकाणी होणारी गर्दी आणि वाढत्या उन्हामुळे पाण्याची गरज लक्षात घेवून दरवर्षी या ठिकाणी पाणपोई सुरू केली जाते. या पाणपोईचे उद्घाटन व्यापारी नागनाथ सब्बन व नागेश ताटी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी चन्नवीर चिट्टे, भिमाशंकर जमादार, अंबादास नडीमेटला, श्रीनिवास चिम्मण किरण वल्लाल, विश्वनाथ कट्टा, पप्पू क्षीरसागर, श्रीनिवास दासरी, कल्याण करजगी, शिवा कानकुर्ती, सद्दाम कोसगींकर, नागेश जक्कन, सिध्दू येमुल, सागर हलसगी यांची उपस्थिती होती.

## नातेपुते येथे रूट मार्च व शांतता कमिटीची बैठक

**नातेपुते** : नातेपुते येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुणे पंढरपूर मेन रोड, आंबेडकर चौक, दहिगांव रोड अण्णाभाऊ साठे चौक, मेन बाजार पेठ, नगरपंचायत रोड या भागात ३६ पोलीस कर्मचारी व २ पोलीस अधिकारीसह रूट मार्च शहरातून काढण्यात आला.

सदर रूटमार्च नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आला होता. तसेच नातेपुते पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी पोलीस ठाणे परिसरातील

नातेपुते शहरातील सामाजिक सलोख्याची भावना कायम राहून धार्मिक एकोपा टिकावा याकरीता सर्व धर्मियांनी सहकार्य करावे. डॉ. आंबेडकर यांचे आदर्श विचार लोकांनी अंगीकारावे आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरा करतात या महत्वपूर्ण दिवसाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये येणारे सर्व राष्ट्रीय सण एकात्मतेच्या भावनेतून व शांततेत पार पडतील यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

**- प्रवीण संपांगे (सहाय्यक पोलीस निरीक्षक नातेपुते पोलीस ठाणे)**



जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष, सदस्य पोलीस मित्र, पोलीस पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवा दरम्यान कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होवू नये, कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये याकरिता काय खबरदारी घ्यावी याचे मार्गदर्शन करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन अकलूज उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुंजे यांनी केले.ठाण्याच्या हद्दीतील सर्व पोलीस पाटील, राजकीय व्यक्ती, प्रतिष्ठीत व्यक्ती, तरुण युवक मंडळी मोठ्या संख्येने शांतता कमिटी बैठकीस उपस्थित होते.


## सोनेरी दृष्टीचा जननायक : धैर्यशील मोहिते-पाटील

पावसाच्या प्रत्येक थेंबाचा मोती तयार होत नाही तर स्वाती नक्षत्रातील काही ठरावीक थेंबच शिंपल्यामध्ये पडतात आणि त्याचाच मोती तयार होतो असे मोती आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतात असाच मोती सोलापूर जिल्ह्याला धैर्यशील मोहिते पाटील यांच्या रूपाने मिळाला असून मोहिते पाटील घराण्याचा वारसा लाभला असला तरी स्वकर्तृत्वाने सिद्ध झालेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख सर्वदूर होताना दिसत आहे.



विनम्रता, विद्वत्ता आणि विचलता या मानवी जीवनातील गुणांचे सुंदर प्रतीक,सहनशीलता हा स्थायिभाव तर निर्भयता, क्षमक्षिलता आणि कर्तव्यदक्षता हे धैर्यशील मोहिते पाटील यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत. प्रयत्नवादास प्रथम स्थान देणाऱ्या या नेतृत्वाच्या कृतिशील विचारातून आणि कार्यपद्धतीतून जिल्ह्याला एका कणखर बुद्धिमान नेता गवसला आहे. विचारात निष्ठा, कार्यात तत्परता, कर्तृत्वात निर्भीडता, राजनीतीत व्यापकता असा समर्थ नेता म्हणूनच त्यांचा सध्या उल्लेख केला जात आहे. सामाजिक जबाबदारीचे भान जपणारा आणि मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करणारा नेता म्हणून त्यांची विशेष ओळख राहिली आहे. अनेक पदे त्यांनी आजपर्यंत भूषवली त्या प्रत्येक पदाला त्यांनी न्याय दिला आहे. राजकारणातून मिळालेल्या प्रत्येक पदाला लोकाभिमुखतेची जोड दिली. समाज सेवेचा वारू कधी थांबू दिला नाही.समाजसेवेचा वसा ते राष्ट्रीय कर्तव्य समजून करताना दिसतात. डोळे सर्वांनाच असतात मात्र भविष्याचा वेध घेण्याची दूरदृष्टी कर्तृत्ववान व्यक्तीलाच असते म्हणूनच स्वकर्तृत्वाने जनसामान्यांच्या हृदय सिंहासनावर ते विराजमान झालेले अद्वितीय नेतृत्व ठरले आहेत. आजकाल अनेक नेते मंडळी राजकारण करत असताना कोणावर तरी वर्चस्व निर्माण करण्याच्या हेतूने समाजसेवेचा देखावा करीत ढोंगीपणा करताना दिसतात यामुळे त्यांना तात्पुरत्या स्वरूपात समाधान मिळते पण जनतेच्या लक्षात आल्यानंतर अशी क्षणिक वादळे हवेत विरून जातात त्यामुळे सामाजिक कार्याचा आपला उद्देश साफ असला पाहिजे तरच त्या नेतृत्वाला लोकमान्यता मिळते आणि अशाच नेतृत्वाचा जनता जनार्दन नेहमी गौरव करीत असते. आणि हाच गौरव धैर्यशील मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाला प्राप्त झाला आहे.त्यांच्या अविरत सेवेचे जनतेकडून स्वागत होताना दिसते आहे. मनात कधीही त्यांनी कटुता भावना ठेवली नाही. देवाला हात जोडताना दुःखितांचे दुःख दूर कर याच भावना त्यांच्या मनात असतात. त्यांची वृत्ती निधर्मवादी आहे.मानवता वाद हा त्यांच्या जीवनाचा विशेष गुण राहिला आहे. समाजकारणातून मानव सेवा करीत असताना राजकारणातून विकासाच्या प्रक्रियेला ते गतिमान करताना दिसत आहेत. सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय विश्वात त्यांनी अगदी अल्पावधीत आपल्या कर्तृत्वाने मोहोर उमटवली असून जनसामान्यांचा ते एक बुलंद आवाज झाले आहेत. समोर आलेल्या प्रश्नांचे ते अचूकपणे निराकरण करतात. त्यामुळे मोठमोठे प्रश्न ते सहज सोडविताना दिसतात. भाजपामध्ये ते माढा लोकसभेसाठी संघटन महामंत्री म्हणून कार्य करत असताना भाजपाची अद्वितीय बांधणी त्यांनी केली आहे. कार्यकर्त्यांशी डायरेक्ट ते कनेक्ट असल्याने व सातत्याने त्यांच्या संपर्कात असल्याने भाजपा पक्षाला खऱ्या अर्थाने अच्छे दिन आल्याचे दिसत आहे. अगदी कुमारवयापासून समाजसेवेचा वसा त्यांनी जोपासला असून आज तागायत ते अविरत सेवेच्या माध्यमातून जनतेची सेवा करताना दिसत आहेत. शिवामृत दूध संघाची विविध उत्पादने जनतेच्या सेवेसाठी त्यांनी बाजारात आणून या संघाला उंची प्राप्त करून दिली आहे. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे अनमोल कार्य दीपस्तंभ प्रमाणे तेजोमय होताना दिसत आहे. ताराराणी कुस्ती केंद्राच्या माध्यमातून आपल्या ग्रामीण भागातील मुली राष्ट्रीय खेळाडू निर्माण झाल्या पाहिजेत म्हणून त्यांची सदैव धडपड दिसते. राजकारण समाजकारण साहित्य क्रिडा कला संस्कृतिक अशा विविध क्षेत्रात त्यांनी आजपर्यंत विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. प्रथम एज्युकेशन फाउंडेशन च्या माध्यमातून अगदी शिक्षणापासून दूर गेलेल्या मुली महिला यांना त्यांनी जीवनात यशस्वी होण्याची संधी प्राप्त करून दिली असून यामुळे अनेक महिलांच्या जीवनात सोनेरी पहाट उजाडलेली दिसत आहे. महिलांच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा व्हाव्यात यासाठी त्यांनी कुस्तीगीर परिषदेकडे अनेक वेळा पाठपुरावा केला आणि सध्या दिनांक ५ मे ते ७ मे रोजी ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धा त्यांनी आयोजित केल्या असून यामुळे कुस्ती क्षेत्रातील अनेक मुलींना संधी प्राप्त होणार आहे. प्रत्येक कार्यक्रम राबवताना त्यांची समाजाप्रती असणारी बांधिलकी दिसते. सातत्याने कार्यकर्त्यांच्या गराड्यात राहणारा हा नेता प्रत्येकाच्या सुखदुःखात सामील होताना दिसतो. म्हणूनच त्यांच्या संपर्कात आलेला व्यक्ती त्यांना कधीही विसरू शकत नाही. म्हणूनच धैर्यशील मोहिते पाटील ही एक आता व्यक्ती राहिली नसून ती एक विराट शक्ती निर्माण झाली आहे आणि ही विराट शक्ती संसदेत गर्जली पाहिजे इतकेच..

**- डी.एस.गायकवाड**



# प्रिसिजनच्या माध्यमातून जिल्ह्यातील ९ शाळांना ११ ई लर्निंग इंटरॅक्टिव्ह पॅनलचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

**प्रिसिजन फाऊंडेशनच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील ९ शाळांना ११ वर्गखोल्यांमध्ये सीएसआर च्या मध्यमातून ई लर्निंग इंटरॅक्टीव्ह पॅनल चे वाटप करण्यात आले. याच ९ शाळांमधील एकूण ५५ शिक्षकांचे प्रशिक्षण सोलापूर येथील सेवासदन शाळामध्ये संपन्न झाले. सेवासदन संस्थेच्या सचिव विना पत्की, मुख्याध्यापिका रणपिसे मॅडम सर फाऊंडेशनचे बाळासाहेब वाघ, सिद्धाराम मासाळे, अनघा जहागिरदार, राजकिरण चव्हाण व अन्य शिक्षक यांच्या उपस्थिती मध्ये ह्या प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले.**

## संबंधित शाळांमधील शिक्षकांना ई-लर्निंगचे प्रशिक्षण




उदघाटन प्रसंगी विना पत्कि यांनी प्रिसिजनचा ई लर्निंग प्रकल्पाचे कौतुक करून ह्या प्रकल्पमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते मध्ये वाढ होण्यासाठी मदत होईल तसेच शिक्षकांना शिकवताना इंटरॲक्टिव्ह टूलमुळे अधिक सोप्या पद्धतीने शिकविता येईल, प्रिसिजनचा ई लर्निंग प्रकल्पा म्हणजे विद्यार्थी व शिक्षकांना 'पॅसिव्ह' न होऊ देता अधिकाधिक 'ॲक्टिव्ह' करणारी, विचार करायला भाग पाडणारी ही अत्याधुनिक शिक्षणपद्धती आहे. असे त्या आपल्या उदघाटनपर भाषणात म्हणाल्या. त्यानंतर सर फाऊंडेशनचे बाळासाहेब वाघ यांनी मनोगत व्यक्त केले सर फाऊंडेशन आणि प्रिसिजन मिळून हा प्रकल्प संपूर्ण जिल्ह्यात कशा पद्धतीने राबवित आहे याची माहिती त्यांनी दिली.

ई लर्निंग' म्हणजे काय ?

दृक् -श्राव्य (ऑडिओ -व्हिजुअल) माध्यमाचा माणसाच्या मनावर मोठा परिणाम होत असतो. केवळ अक्षरं वाचण्यापेक्षा या माध्यमातून मांडलेली गोष्ट जास्त परिणामकारक असते. या पद्धतीमुळे मनाला आणि मेंदूला येणारे अनुभवही वेगळे असतात आणि त्यामुळे ते दीर्घकाळ लक्षात राहतात. छापील स्थिर चिन्हांपेक्षा ही हलणारी चित्रं मेंदूला निश्चितच आवडतील आणि समजतील. त्यामुळे अर्थातच संकल्पना मूळातून समजेल आणि दीर्घकाळ स्मरणात राहील. पण 'ई लर्निंग' म्हणजे पडद्यावर काहीतरी ॲनिमेटेड हालचाल पाहणं एवढंच आहे का? तर नाही. पाहिल्यामुळे मेंदूची उत्कंठा वाढेल पण तो एंगेज होणार नाही. त्यासाठी काहीतरी ॲक्टिव्हिटी करावी लागेल. यासाठीच प्रिसिजनच्या ई लर्निंग प्रोजेक्टमध्ये केवळ काहीतरी ऑडिओ-व्हिजुअल दाखवलं जात नाही तर इंटरॲक्टिव्ह टूलच्या माध्यमातून मुलं ई लर्निंग किट प्रत्यक्ष हाताळून पाहतात. २०१५ पासून हा प्रकल्प चालू आहे.

### प्रिसिजन ई लर्निंग प्रकल्प एका दृष्टीक्षेपात

- एकूण तालुके : १०
- एकूण गावे : १२०
- एकूण शाळा : १४४
- एकूण डिजिटल क्लासरूम्स : १६१
- एकूण लाभार्थी शिक्षकसंख्या : ११५०
- एकूण लाभार्थी विद्यार्थीसंख्या : २८,७०९



## अशोक पाचकुडवे यांना राष्ट्रीय संविधान सन्मान पुरस्कार कोल्हापूर येथे प्रदान

✔ **मोहोळ** : मोहोळ येथील राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे जेष्ठ शिक्षक प्रा. अशोक पाचकुडवे याना कोल्हापुर येथील निर्मिती विचारमंच व संविधान जन जागरण आभियान कोल्हापुर यांच्या वतीने त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्याना राष्ट्रीय संविधान सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोल्हापुर येथील छत्रपती शाहू महाराज सभागृहात ९ एप्रिल रोजी माजी आमदार राजीव आवळे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत त्याना सन्मानीत करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. श्रीपाद देसाई, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. अनिल म्हमाणे, विजया कांबळे, साहित्यिक प्रा.डॉ. नंदकुमार गोंधळी, फुले शाहू आंबेडकर चळवळीचे नेते प्रा. शहाजी कांबळे, ॲड करुणा विमल, डॉ. शोभा चाळके, प्रा. संदीप कांबळे, प्रा. डॉ. आस्मिता प्रधान, डॉ. अनुप्रीया गावडे, सुभाष बुरंगे, भुजंगराव पाचकुडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

## आण्णासाहेब भालशंकर याना पंचशील रत्न पुरस्कार जाहीर



✔ **मोहोळ** : मोहोळ येथील पंचशील मंडळाच्या वतीने दिला जाणारा मानाचा व प्रतीष्ठेचा पंचशील रत्न पुरस्कार बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेश अध्यक्ष, फुले शाहू आंबेडकर चळवळीचे आनुयायी व गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रसार करणारे, सोलापुर येथील सामाजिक कार्यकर्ते आण्णासाहेब भालशंकर याना जाहीर करण्यात आला. ही माहिती पंचशील मंडळाचे वतीने संस्थापक प्रा.अशोक पाचकुडवे अध्यक्ष शशिकांत ठोकळे जयंती उत्सव मंडळ अध्यक्ष अक्षय आठवले सचिव आदर्श ढवळे यांनी यानी दिली. मोहोळ येथील पंचशील क्रिडा, शिक्षण व सांस्कृतिक मंडळ प्रतीवर्षी तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आदर्श काम करणारे जिल्ह्यातील एका व्यक्तींची निवड करुन त्याना सन्मानीत केले जाते. हे मंडळ गेल्या २५ वर्षा पासून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करत आसुन पुरस्कार देण्याचे हे १६ वे वर्ष आहे. यावर्षी आण्णासाहेब भालशंकर याना १७ एप्रिल रोजी आप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे. यावेळी विशाल रोडे, सचीन सोनवणे, सुरज पाचकुडवे, दीपक माडिखांबे, सिध्दार्थ निकंबे तसेच मंडळाचे जेष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.



## महात्मा फुले जयंतीनिमित्त पिरळे येथे रक्तदान शिबिर

✔ **नातेपुते** : पिरळे (ता. माळशिरस) येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. गेल्या दहा वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर,भगवान महावीर, महात्मा बसवेश्वर या महामानवांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन पिरळे येथे करण्यात येत असल्याचे आयोजक समितीने सांगितले. महात्मा फुले जयंतीनिमित्त १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून या शिबिराचे चेउद्घाटन भीमा कोरेगाव संरक्षण संघर्ष समिती अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार स्तंभ लेखक दादाभाऊ अभंग त्यांच्यास्ते करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक सुनील साळवे व एन डी एमजे राज्यसचिव वैभव गीते,ज्ञानदीप संस्थेचे प्राचार्यसी.डी ढोबळे तसेच पिरळे गावचे मा सरपंच संदीप नरोळे, प्राध्यापक दीपक शिंदे,सरपंच रेश्मा दडस,ग्रामसेवक हनुमंत आदी. मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते सर्व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच दादाभाऊ अभंग,वैभव गीते ,प्राध्यापक सुनील साळवे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच ३२ पिढीतांचे पुनर्वसन करून त्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल पिरळे ग्रामस्थ व दादाभाऊ अभंग यांच्या वतीने वैभव गिते यांचा भव्य नागरिक सत्कारकरण्यात आला.याप्रसंगी पंढरपूर येथील ॲड. रोहित एकमल्ली,उस्मानाबाद आदिनाथ राऊत, पोलीस पाटील औदुंबर बुधावले,संदीप वाघसर ,डॉ हनुमंत माने,दत्तात्रय लवटे,महादेव शिंदे शिवाजी लवटे, तंटामुक्ती अध्यक्ष संजय पाटील, ह भ प खेडेकर महाराज,धनंजय ढगे ,सुदाम बुधावले,जिल्हा परिषद शिक्षक,संजय ढवळे ,जब्बार मुलानी तसेच पंचक्रोशीतील अनेक मान्यवर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.रक्तदान यशस्वी होण्यासाठी प्रमोद शिंदे,प्रशांत खरात ,प्रज्ञेश कांबळे,मोहन शिंदे,चैतन्य बल्लाळ,मयूर साळवे,अक्षय ठवरे, तसेच ज्ञानदीप रक्तपेढीतील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## प्रा. स्फूर्ती बिराजदार यांना पीएच.डी प्रदान



✔ **सोलापूर** : प्रा. स्फूर्ती बिराजदार यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची पीएच.डी प्रदान करण्यात आली. सिंधी, मारवाडी आणि जैन समाजाच्या कौटुंबिक व्यवसाय व्यवस्थापन पद्धती आणि पश्चिम महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात अंतर्निहित व्यवसाय मॉडेलचा विश्लेषणात्मक अभ्यास हा त्यांच्या शोधनिबंधाचा विषय होता. पश्चिम महाराष्ट्रातील कौटुंबिक व्यवसायाची स्थापना, नियोजन आणि व्यवस्थापनाचा अभ्यास करून हा शोधनिबंध प्रा. स्फूर्ती बिराजदार यांनी तयार केला. हे संशोधन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल बारबोले, डॉ. दत्तात्रय गंधारे, डॉ.एस.के. पाटील, प्रा. डॉ. इम्तियाज सय्यद, प्रा. डॉ. सुगंधराज कुलकर्णी, सुधीर बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. डॉ. स्फूर्ती बिराजदार पुणे येथील डी. वाय. पाटील कॉलेज येथे एमबीए विभागात रुजू झाल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## प्रशांत चंचलकर यांचे निधन



✔ **सोलापूर** : काडादी चाळीमधील रहिवासी प्रशांत नारायण चंचलकर यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, भाऊ, भावजय, बहिणी असा परिवार आहे.

## सोशल मीडियाद्वारे धार्मिक भावना दुखावणारे मेसेज करू नये : सरदेशपांडे

✔ सुराज्य/सांगोला




सांगोला तालुक्यात धार्मिक सलोखा नेहमीच चांगला आहे. यापुढेही सर्व जयंती उत्सव सण असेच शांततेने व एकोप्याने साजरी करावेत. सोशल मीडियाद्वारे धार्मिक भावना दुखावणारे मेसेज करून समाजाची शांतता बिघडवण्याचे काम कोण करत असेल तर त्यावर कठोर कारवाई केली जाईल असा इशारा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिला.

आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव, रमजान ईद व महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त शांतता समितीची बैठक पंचायत समितीच्या बचत भवनमध्ये बुधवारी आयोजित करण्यात आली होती. यावेळी खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजी पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री पाटील, पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी, तहसीलदार अभिजित पाटील, गटविकास अधिकारी आनंद लोकरे, तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे, मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, महावितरणचे उपअभियंता आनंद पवार, भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल पवार, बाबुराव गायकवाड, तानाजी पाटील, शब्बीरभाई खतीब, खंडू सातपुते, दादासाहेब लवटे, दीपक खटकाळे, तानाजी बनसोडे, सुरज बनसोडे यांच्यासह जयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार शहाजी पाटील म्हणाले, सांगोला तालुका शांतताप्रिय आहे. सर्वच सण गुण्यागोविंदाने साजरे होतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या कामाचे लवकरच भूमिपूजन करण्यात येणार आहे. यावेळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यासह बाबुराव गायकवाड, हाजी शब्बीरभाई खतीब, सुरज बनसोडे, खंडू सातपुते, प्रभाकर कसबे, बाबासाहेब बनसोडे, बापुसाहेब ठोकळे, मनोज उकळे यांनी मनोगत व्यक्त करून आपल्या सूचना सांगितल्या. प्रस्ताविक सांगोल्याचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी केले. पोलीस उपनिरीक्षक नागेश यमगर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## लष्कर मध्यवर्तीतर्फे आंबेडकर जयंतीचे कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

लष्कर मध्यवर्ती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महामंडळाच्या वतीने यंदा विविध उपक्रमाच्या आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती अध्यक्ष प्रवीण वाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवार दि. १४ एप्रिल रोजी एमआयएमचे जिल्हाध्यक्ष हाजी फारूक शाब्दि यांच्या हस्ते व राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांच्या अध्यक्षतेखाली भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता गायक प्रा. जीवन शिंदे आणि पार्टी यांचा भीम गीताचा कार्यक्रम होणार आहे. दि. १६ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ७ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेताना या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. विलास आढाव यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यक्षस्थानी पत्रकार नदीम इनामदार हे राहणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. ज्योती वाघमारे , माजी नगरसेवक एन.के. क्षीरसागर व विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे, असे अध्यक्ष प्रवीण वाडे यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेस देवेंद्र भंडारे, गंगाधर शिंदे, कोमल माचले, नारायण शिंदे, अंबादास मरेड्डी, व्यंकटेश भंडारे आदी उपस्थित होते.




## बिकट परिस्थितीवर मात करुन मार्डीचा गिरे झाला केंद्रीय रक्षा अनुसंधान खात्यात शास्त्रज्ञ

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

परिस्थिती नसल्यामुळे प्रशांतला शिक्षणासाठी मदत करण्यासाठी बँकांनी नकार दिला. मात्र नरोटेवाडी येथील उद्योगपती एस.पी. काळे यांनी स्वतः जामीन होऊन त्याला साडेपाच लाख रुपयांचे कर्ज बँकेकडून मंजूर करुन दिले. एका होतकरु गरीब कुटुंबातील तरुणाला काळे यांनी शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.

मार्डी येथील प्रशांत दगडू गिरे याची केंद्र सरकारच्या रक्षा अनुसंधान एवं विकास संघटन (डी.आर.डी.ओ.) मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. या यशाबद्दल त्याचा व त्याच्या आई-वडिलांचा सोमवारी मार्डी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आपल्या गावातील प्रशांत गिरे याची डी.आर.डी.ओ.मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. ग्रामस्थांनी त्याचा भव्य सत्कार केला.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार अध्यक्षस्थानी होते. माजी सरपंच अविनाश मार्तंडे, उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, भाजपाचे ज्येष्ठ नेते शिवाजी सोनार, दगडू गिरे,शकुंतला गिरे, ॲड.इंद्रजीत पाटील, मल्हारी काळे, तालुका अध्यक्ष काशीनाथ कदम, प्रल्हाद काशीद, महात्मा फुले प्रशालेचे मुख्याध्यापक सुजित इनामदार, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नामदेव गवळी, बाळासाहेब पाटील, युवराज पवार, गणेश पवार, प्रशांत वैदकर, हनुमंत बनसोडे, तायप्पा शेंडगे, धन्यकुमार मुडके, एम.एस. विटकर, शशिकांत मार्तंडे, प्रशांत काशीद, विष्णु जगताप, पांडुरंग कदम, प्रा. शाहुराजे पाटील, अझरुद्दीन शेख, संजय खरटमल यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गाव हे एक कुटुंब आहे, ही भूमिका ठेवून प्रत्येकाने गावाच्या भल्यासाठी एकत्रित यावे, असे आवाहन करुन शहाजी पवार म्हणाले, प्रशांत गिरे याचा आदर्श प्रत्येक तरुणाने घेणे गरजेचे आहे. पॅकेजच्या मागे लागणारा आजचा युवक समाजिक जाणिवेचे भान विसरत चालला असून प्रत्येक तरुणाने आपली कुटुंबातील, समाजातील जबाबदारी ओळखून जीवनात काही तरी करुन दाखवावे.

यावेळी मार्डी गावातील होमगार्डचा पोलीस कॉन्स्टेबल झालेला राहुल काळे व होनसळ येथील नव्यानेच पोलीस भरती झालेला गणेश वानकर या दोघांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. नामदेव गवळी यांनी प्रास्तविक, पत्रकार दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत वैदकर यांनी आभार मानले.

## कोताळकर मारहाण प्रकरणी चौघांना पाच दिवसांची पोलीस कोठडी

✔ **पंढरपूर** : बांगड्याचा गाडा का लावला म्हणून विचारणा केल्यामुळे चुलत भावांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यामधील चार आरोपींना पुणे येथून पोलीस पथकाने शिताफीने अटक केली आहे.या प्रकरणी शुभम किशोर लखेरी, दिनेश वासुदेव गोमासे, इसा हरून शेख व यश अनिल चव्हाण या चार जणांना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. शुक्रवार आठ रोजी निखिल कोताळकर याची कृष्णा लखेरी याच्याबरोबर वादावादी झाली होती. या कारणावरून निखिल व सुरज कोताळकर या चुलत भावांवर शनिवारी पहाटे वरील आरोपींनी कोयत्याने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. घटना घडल्यापासून सदर आरोपी फरार होते. त्यांना शोधण्यासाठी पोलीस पथक प्रयत्न करीत असताना वरील आरोपी पुणे येथे असल्याची माहिती मिळाली.

## एसपीएम पॉलीटेक्निच्या ४२ विद्यार्थ्यांची कॅम्पसध्येमध्ये निवड

✔ सुराज्य/सोलापूर



एसपीएम पॉलीटेक्निच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील ४२ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्हूमध्ये जय हिंद फोर्स मोटर्स (पुणे) आणि कमिन्स इंडिया लिमिटेड (मुंबई) येथील कंपनीत निवड झाली आहे. या दोन्ही नामांकित सॉफ्टवेअर निर्मिती कंपनी आहे.

संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने आदींनी अभिनंदन केले आहे. यावेळी संस्थेचे टीपीओ प्रा. विनील कोंगारी, प्रा. बसवराज स्वामी, प्रा. प्रकाश मेलगे, प्रा. सोमनाथ थळंगे, प्रा. अनंत चौधरी आदी उपस्थित होते. देशातील नामवंत कंपन्यांमध्ये निवड होण्याची परंपरा एसपीएमच्या विद्यार्थ्यांनी यंदाही कायम राखली.

निवड झालेले विद्यार्थी मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागः आकाश मुळे, किरण केसापुरे, साईकुमार यंगंदुल, ओमकार बिराजदार, सुशांत मदरी, नवीन गड्डम, अभिषेक कडला, अजय मुळे, सागर फुलारी, गणेश कदम, प्रेमकुमार कोळी, सुमित तंबाके, अभिषेक बोमा, सिद्धाराम धोत्रे, शिवप्रसाद जल्ला, प्रतीक गुंडला, भारत फुलपाठी, बसवराज गंगदे, समर्थ सूर्यवंशी, विशाल सोनकांबळे, शरण बसप्पा बाके, इरेश नंदी, विक्रम वैरागकर, साहिल शेख, इरफान नदाफ. सुगर ओमकार, अश्विनी जिला, खादीजा शेख, अभिषेक आयांची, नवीन गड्डम, सागर फुलारी, बसवराज गंगदे.

## ईडीकडून क्लिन चिट मिळालेली नाही, अजूनही चौकशी चालू : अजित पवार

✔ सुराज्य/मुंबई

राजकीय वर्तुळात खळबळ माजवणाऱ्या शिखर बँक घोटाळा प्रकरणाचा तपास गेल्या काही काळासाठी थंडावला होता. परंतू राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आलं असून यावरील तपासाला वेग आलाय. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने आरोपपत्र दाखल केलंय. मात्र यामध्ये अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांचं नाव माहिती ईडीने दिली आहे. त्यामुळे ईडीने अजित पवारांना क्लीन चीट दिला का? अशी चर्चा सध्या राज्यात सुरू झाली आहे. तर अजित पवार लवकरच भाजपमध्ये जाणार अशी अफवा वेगाने पसरतेय. यावर आता अजित पवार यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळ्याप्रकरणी ईडीने आरोपपत्र दाखल केले आहे. मात्र, या आरोपपत्रात विरोधी पक्षनेते अजित पवार व त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचे नाव नाही. त्यामुळे ईडीने अजित पवार व सुनेत्रा पवार यांना क्लीन चीट दिली का?, अशी चर्चा रंगली आहे. यातच काल शरद पवार आणि उद्धव ठाकरेंची सिल्वर ओकवर झालेली बैठक आणि त्यापाठोपाठ आज अजित पवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची घेत असलेली भेहा सर्व घटनाक्रम पाहता भविष्यात मोठी राजकीय घडामोड घडणार का? अशी शंका उपस्थित करण्यात येतेय.



महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळ्याप्रकरणी अजित पवारांनी मोठी माहिती दिली आहे. शिखर बँक घोटाळा प्रकरणी अद्याप क्लीनचिट मिळालेली नाही. या प्रकरणाची चौकशी सध्या सुरूच असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं. तसंच माध्यमात पसरलेली बातमी चुकीची असल्याचं देखील अजित पवारांनी स्पष्ट केले. अजित पवार यांना अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्याबाबत प्रश्न केले असताना यात कसलंही तथ्य नसल्याचं त्यांनी सांगितलं. अजित पवार भाजपाबरोबर जाणार ही अफवा राजकीय वर्तुळात अगदी वाऱ्यासारखी पसरली. यावर बोलताना एवढ्या मोठ्या व्यक्तिबद्दल माझ्यासारखा छोटा कार्यकर्ता काय सांगणार आहे., असं मिश्कीलपणे सांगत अजित पवार यांनी बोलण्याचं टाळलं. अजित पवार आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत. महाराष्ट्रात अवकाळी पाऊसाचं संकट आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना मंगळवारी पत्र देऊन प्रतिहेक्टर ५० हजार रुपये आणि एक लाख रुपये प्रति हेक्टर फळबागांसाठी द्या अशी मागणी केली आहे.

# मंद्रूपच्या ५२८ हेक्टरवरील एमआयडीसीचा शेरा रद्द

## प्रशासनाकडून सात-बाराचे वाटप; शेतकऱ्यांचे वऱ्हाड निघाले परत

सुराज्य/सोलापूर

मंद्रप येथील नियोजित एमआयडीसीची ५२८ हेक्टर क्षेत्र विना अधिसूचित करण्याचा निर्णय शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत झाला होता. या निर्णयाची अमंलबजावणी शासनाकडून केली आहे शेतकऱ्यांच्या सात बारावरील एमआयडीचा शेरा रद्द केला आहे. शेर रद्द केल्याचे सात बारा आंदोलक शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. शेतकऱ्यांनी आनंद साजरा करत जिल्हाप्रशासना समोर मांडलेला ठिय्या रद्द करत आपले वऱ्हाड (बैलगाड्या) परत मंद्रुपला निघाले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात जनावरे घुसवून शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. आमदार बच्चू कडू यांनी यात लक्ष घालून मंत्रालयीन स्तरावरून सूत्रे हलविली. एमआयडीसीचे सचिव देगावकर यांच्याकडे पाठपुरावा केला. अखेर शेतकरी आंदोलनाला यश मिळाले आहे. चार वर्षांपूर्वी मंद्रपला एमआयडीसी मंजूर झाली. मात्र, काही अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे आणि राजकीय नेत्यांच्या दबावामुळे संमती नसलेल्या शेतकऱ्यांच्या जमिन ताब्यात घेतल्या होत्या, याला शेतकऱ्यांनी विरोध केला होता.

तोपर्यंत शेतकऱ्यांच्या सात बारावर एमआयडीसीची नोंद झाली ही नोंद रद्द करण्यासाठी शेतकरी आक्रमक झाले होते. उद्योग मंत्री उदय सामंत सोलापूर दौऱ्यांवर आल्यानंतर शेतकऱ्यांचा विरोध असेल तर जमीन घेतली जाणार नाही असे जाहीर करत लवकर सदरची जमीन एमआयडीची मुक्त केली जाईल असे जाहीर केले होते. तर उताऱ्यावर एमआयडीसीची रद्द व्हावी यासाठी शेतकरी प्रयत्न करीत होते. मंद्रप ते मुंबईपर्यंत शासकीय कार्यालयात व लोकप्रतिनिधींना निवेदन दिले. तरीही प्रश्न सुटत नसल्याने शेतकऱ्यांनी गेल्या सहा महिन्यांपासून आंदोलनास सुरुवात केली होती.



### आंदोलन मागे घेत मुक्कम हलवला

सोलापुरात एक महिना आंदोलन केल्यानंतर पंधरा दिवसांपूर्वी एमआयडीसीचे क्षेत्र विना अधिसूचित करण्यात आले होते. मात्र, उतारा हाती मिळत नव्हता. अखेर प्रशासनाने आम्हाला उताऱ्यावरील एमआयडीसीचा शेरा हटवून उतारा वाटप केल्याने शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश आल्याने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेत मुक्कम हलवला आहे

एमआयडीसीला विरोध करणाऱ्या १४९ शेतकऱ्यांच्या जमिनी वगळून एमआयडीसी करावी, अशी मागणी केली होती. इकडे, शासन व प्रशासन आंदोलनाची दखल घेत नसल्यामुळे अखेर शेतकऱ्यांनी मंद्रप ते मुंबई असा बैलगाडी मोर्चा नेण्याचा निर्णय घेतला. सोलापुरात जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी तुम्ही थांबा तुमचा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन दिले होते.

## पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन करणार : चंदनशिवे

**सोलापूर** : सोलापूर शहरातील अनेक महिन्यांपासून ४ ते ५ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष आहे. महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. लवकरच पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा या माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी दिला आहे. सोलापूर शहरातील नागरिकांना सोलापूर शहरातील महापालिकेच्या वतीने अवेळी आणि चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. महापालिका नागरिकांना मूलभूत सुखसोयी देण्यात कमी पडत आहे. सर्व आजी माजी सर्व पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी सोलापूर शहरातील नागरिकांचे हाल होत असताना बघ्याची भूमिका घेत आहेत. त्यामुळे सोलापूर शहरातील नागरिकांच्या आवाज म्हणून सोलापूरचा पाणीपुरवठा जोपर्यंत सुरळीत होत नाही तोपर्यंत सोलापूरच्या जनतेसाठी उग्र पद्धतीचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा य चंदनशिवे यांनी दिला आहे.

## भाजप अनुसूचित जातीतर्फे आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यान

**सोलापूर** : भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती आघाडीतर्फे भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त शुक्रवार १४ रोजी स. ११ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री दिलीप कांबळे यावेळी मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती प्रा. डॉ. नारायण बनसोडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.या कार्यक्रमास खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, भाजपा अनुसूचित जाती आघाडीचे जिल्हाध्यक्ष चांगदेव कांबळे, शहर अध्यक्ष बाबुराव संगेपाग यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सोलापूरकरांनी याख्यानांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भ शहर अध्यक्ष बाबुराव संगेपाग यांनी यावेळी केले. या पत्रकार परिषदेस अनंत गोडलोलू, शिवानंद वडतीले, नारायण बनसोडे,अजित गादेकर, आदी उपस्थित होते.

## जैन समाजासाठी ऑनलाईन वधूवर पालक परिचय संमेलन

**सोलापूर** : सकल दिगंबर जैन समाजासाठी रविवारी १६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत सोलापुरात प्रथमच वधू-वर पालक परिचय ऑनलाईन संमेलन (मेळावा) आयोजित केला आहे, अशी माहिती संयोजक डॉ. अजित माणिकशेटे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. जगभरातून घरबसल्या कोठूनही या वधू-वर पालक परिचय संमेलनात सहभागी होता येईल. कमीत कमी अवधीत व माफक शुल्कामध्ये अधिकाधिक उमेदवारांशी संपर्क साधणे हे या मेळाव्याचे वैशिष्ट्य आहे, इच्छुकांनी http://vadhuvarmelava.com या लिंकवर १४ एप्रिलपर्यंत नाव नोंदणी करावी. या संमेलनाचे उद्घाटन सकल दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष हर्षवर्धन शहा यांच्या हस्ते १५ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता विजापूर रोडवरील कुबेर चेंबर्स, विद्यावाचस्पती पंडित वर्धमान शास्त्री सांस्कृतिक भवन येथे होणार आहे. या पत्रकार परिषदेस समितीचे अनिल जमगे, अरुण धुमाळ, सुमेरचंद जमालपुरे, देशभूषण व्हसाळे, राजेंद्र पाटील, जयकुमार पंडित, अजितकुमार संगवे आदी उपस्थित होते.

## कॅशियरने चार लाखांची रक्कम चोरली

**सोलापूर** : आसरा चौकातील रेनॉल्ट कार शोरूमचे कॅशियर म्हणून काम करणाऱ्या संशयित आरोपी व्यंकटेश मुरली संदुपटला (वय-२३,रा.साईबाबा चौक) याने शोरूमच्या अकाउंट रूम मधील लोखंडी कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेली चार लाखांची रक्कम त्याच्याजवळ असलेल्या चावीने लॉकर उघडून चोरून नेली आहे.ही घटना दि.१० एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या दरम्यान रेनॉल्ट कार शोरूम येथे घडली.अशा आशयाची फिर्याद नरेंद्र बालय्या गादास (वय-२३,रा.पाटील नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे.घटनेचा पुढील तपास पोसई मुरकुटे हे करीत आहेत.

# बाधित शेतकऱ्यांनी बँक खात्याला आधार लिंक करा

## शमा पवार यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतीपिकांचे व शेतजमिनीचे नुकसान झालेल्या उत्तर सोलापूर, मंद्रुप, अक्कलकोट, बार्शी, माढा, करमाळा, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर व सांगोला तालुक्यातील पात्र बाधित शेतकऱ्यांची यादी संबंधित तहसिलदारांनी पोर्टलवर अपलोड केली आहे. या यादीमधील पेमेंट स्टेटस रिमार्कमध्ये ज्या शेतकऱ्यांचे स्टेटस सक्सेस दाखवत आहे अशा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये मदतीची रक्कम शासनामार्फत जमा करण्यात आली आहे.

ज्या शेतकऱ्यांचे स्टेटस फेल दाखवत आहे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत संबंधित खातेदारांनी बँक खात्याला आधार लिंक करून घ्यावे व आधार लिंक असल्यास पन्नास किंवा शंभर रूपयांचे ट्रान्झॅक्शन करावे, असे आवाहन शमा पवार यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतीपिकांचे व शेतजमिनीचे नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना यापुढे मदतीचा निधी प्रचलित कार्यपध्दतीनुसार वितरीत करण्यात येणार नाही. त्याऐवजी महाआयटी यांच्याकडून यासाठी विकसित करण्यात येणाऱ्या संगणकीय प्रणालीव्दारे शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम शासनामार्फत वितरीत करण्यात येणार आहे. शासने अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदतनिधी वितरीत करण्याकामी शासनाने मान्यता दिली आहे.

शासन निर्णयानुसार बाधित शेतकऱ्यांना मदतनिधी वितरीत करण्याकामी संबंधित तहसिलदार यांनी बाधित शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर अपलोड केली आहे. यादीला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूरी दिली आहे, असे प्रशासनाने कळवले आहे.

### पेमेंट हिस्टर नावाचे नवीन टॅब उपलब्ध

पोर्टलवर शासनाने पेमेंट हिस्टर नावाचे नवीन टॅब उपलब्ध करून दिले आहे. त्यामधून तालुकानिहाय यादी डाऊनलोड करून संबंधित तहसिलदार यांना उपलब्ध करून दिली आहे. ही यादी ग्रामपंचायतीमध्ये प्रसिध्द करण्यात येईल. या यादीचे वाचन करण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील.

## सावकारी व्याजाच्या पैशाला कंटाळून तरुणाने सोडले घर

### पाच वर्षानंतर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

सावकाराकडून व्याजाने घेतलेल्या पैशाच्या कारणाला कंटाळून एक तरुण चिठ्ठी लिहून घर सोडून गेल्याची घटना सन २०१८ मध्ये कल्याण नगर भाग १ जुळे सोलापूर येथे घडली. याप्रकरणी विमल दीपक गोरे (वय-५३,रा.कल्याण नगर जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अक्षय ससाने,अनिल माशाळ,अमोल कांबळे,उमेश जाधव यांची बहीण,नवीन वॉल्टर (सर्व.रा. कल्याण नगर भाग १) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. विमल यांचा मुलगा प्रशांत याने वरील संशयित आरोपींकडून व्याजाने पैसे घेतले होते. ते प्रशांतला सतत त्रास देत होते. त्यामुळे प्रशांत हा सन २०१८ मध्ये कंटाळून घर सोडून गेला. जाताना घरात एक चिठ्ठी लिहून लिहली होती. ती चिठ्ठी फिर्यादी विमल गोरे यांना बुधवारी उशिरा मिळाल्याने वरील संशयित आरोपी यांच्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस नाईक विधाते हे करीत आहेत.

## मेव्हण्याने केली भाऊजीला मारहाण

सुराज्य/सोलापूर

संजय उत्तम काळे (वय-३६, रा.राघवेंद्र मंदिर जवळ जुना विडी घरकुल) हे बंद गाळ्यासमोर थांबले असताना त्यांना लहान मेहुणा संदीप प्रलाद चव्हाण (रा.नवीन विडी घरकुल) याने तू सारखे माझ्या मोठी बहिणीसोबत का वाद घालतो असे म्हणत मारहाण केली. ही घटना दि.१० एप्रिल रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास तोगटवीर बालक मंदिर समोर घडली. संजय काळे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत.

# पत्रावळ्या फेकाव्यात, तसे मी सातबारे फेकले : आ. शहाजीबापू

सुराज्य/सोलापूर

शरद पवार हे ४५ वर्षे माझे पालक होते, पण त्यांच्याजवळ गेलेल्या छोट्या पक्षांना त्यांनीच संपवलं, असा आरोप आ. शहाजीबापू पाटील यांनी केला.

तुमची ५० खोकी तुम्हालाच लखलाभ, आम्ही पाटलाची औलाद आहे, जातींवंत आहे, पावणे दोनशे खोकी पत्रावळ्या फेकाव्यात; तसे मी सातबारे फेकले आहेत, अशा शब्दात शहाजीबापूंनी खोक्यांचा समाचार घेतला.



राज्यात एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात सरकार आल्यानंतर आता शिवसेना विरुद्ध शिवसेना सामना रंगला आहे.

महाविकास आघाडीसह शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांकडून शिंदे गटावर सातत्याने खोक्यांची टीका केली जाते. प्रत्येक सभेत गद्दार आणि ५० खोके म्हणत शिंदे गटाच्या आमदारांना लक्ष्य करण्यात येते. त्यामुळे, शिंदे गटाकडूनही पलटवार करण्यात येतो.

आता, आमदार शहाजीबापू पाटील यांनी उद्धव ठाकरेंसह, अजित पवार आणि ५० खोक्के म्हणून चिडवणाऱ्यांना आपण जातींवंत पाटील असल्याचे सांगितले. ते म्हणाले, तुमच्या पुढच्या पिढीची सोय करायचीय म्हणून ते खोके तुम्हालाच लखलाभ. ही पाटलाची औलाद आहे, जातींवंत आहे, पावणे दोनशे खोक्यांच्या जमिनीचे उतारे पत्रावळ्या फेकाव्यात; तसे मी फेकले आहेत, असे म्हणत शहाजीबापू पाटील यांनी ५० खोक्यांवरुन चिडवणाऱ्यांना फटकारले आहे.

### शहाजी पाटील ही कर्णाची औलाद

शहाजी पाटील ही कर्णाची औलाद आहे, घरात घेऊन जाणारा नव्हे. तुम्ही साचवून ठेवा, नातवासाठी. तुमचं नासून जाणार. आमचा खळखळणारा झरा, आलं इकडं गेलं तिकडं, असे म्हणत आमदार शहाजी पाटील यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांना लक्ष्य केले.

## शहरात कोरोना रूग्णांची संख्या ४६वर

**सोलापूर** : सोलापूर शहरातील कोरोनाची रुग्णसंख्या ४६ वर पोहोचली आहे. बुधवारी प्राप्त झालेल्या अहवालावरून पाच रुग्ण वाढले आहेत. मजरेवाडी, रामवाडी, साबळे, शेळगी, सोरेगाव नागरी आरोग्य केंद्र परिसरातील हे पाच रुग्ण आहेत. सोलापुरातील रुग्णसंख्या मंगळवारी ७२ जणांची टेस्ट करण्यात आली होती, ५ जणांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. १६ ते ३० वयोगटातील २, ३१ ते ५० वयोगटातील २, तर ६० पेक्षा जास्त वयोगट असलेले एका रुग्णाचा समावेश आहे.

# धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कॅप वाटप

सुराज्य/अकलूज



भारतीय जनता पार्टीचे सोलापूर जिल्हा संघटक धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अकलूज परीसरासह माळेवाडी,यशवंतनगर या गावांतील जिल्हा परीषदेच्या १५ शाळेतील २ हजार विद्यार्थ्यांना उन्हाळ्याचा तडाखा बसु नये यासाठी कॅप वाटप करण्यात आल्या.

धैर्यशील मोहिते-पाटील मित्र मंडळ,सिंहगर्जना मित्र मंडळ, रॉयल राईड, दयावान ग्रुप, एसबी ग्रुप,शिवरत्न व डॉटर्स मॉम फाऊंडेशनच्यावतीने धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने २ हजार विद्यार्थी मुला-मुलींना कॅप्चे वाटप जि.प सदस्या शितलदेवी मोहिते पाटील, स्वरुपाराणी मोहिते पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील,सत्यशील मोहिते-पाटील, देवश्रीदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धनंजय देशमुख, क्रांतिसिंह माने पाटील, कृष्णराज माने पाटील,डॉ. विश्वनाथ आवाड,श्रीकांत राऊत,नितीन बनकर,अनिल जाधव महेश पोरे, किरण डोंगरे, अमोल शिंदे , मनोहर एकतपुरे, विनोद थोरात, रामकृष्ण काटकर अरुण एकतपुरे, लालासाहेब अडगळे,पराग गायकवाड, उत्कर्ष शेटे, विशाल मोरे, राहुल फुले, रणजित भोसले, मिलिंद कोतमिरे, तनवीर तांबोळी, गणेश जामदार, शैलेश दिवटे, शिक्षण विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे, सायरा मुलाणी, केंद्र प्रमुख राजेंद्र जाधव,विठ्ठल नष्टे,वर्षा सरतापे,रामकृष्ण काटकर,नितीन थोरात, विठ्ठल काळे, समाधान वाघमारे आदी संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना शितलदेवी मोहिते पाटील म्हणाल्या, मित्र मंडळ व सिंहगर्जना मंडळ विधायक उपक्रम राबवितात. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना बेंचची सोय, कंप्युटर ई- शिक्षण,डिजीटल क्लास रुम,ड्रेस वाटप, सायकल वाटप या बरोबरच लोकोपयोगी उपक्रम राबविले आहे. यावर्षी ताराराणी महिला कुस्ती केंद्राच्यावतीने राष्ट्रीय स्तरावर महिलांच्या कुस्ती स्पर्धा अयोजित करण्यात आल्या आहेत.

## सोनसाखळी चोराला १५ महिन्यांची शिक्षा

**पंढरपूर** : पंढरपूर- ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील दोन तोळे सोन्याचे मंगळसूत्र चोरल्याप्रकरणी आरोपीस येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम.आर. कामत यांनी १५ महिन्याची शिक्षा व दंड सुनावला आहे. अजय संजय आढाव (मेडद, ता. माळशिरस) असे त्याचे नाव आहे.

८ सप्टेंबर २०२१ रोजी शहरातील पुंडलिक नगर येथील वृषाली माचणुरकर ही ६८ वर्षीय महिला सकाळी फिरण्यासाठी निघाली होती. दुचाकीवरून आलेल्या आरोपी अजय आढाव याने त्यांच्या गळ्यातील दोन तोळे सोन्याचे मणीमंगळसूत्र बळजबरीने हिसकावून नेले होते. हवालदार सुरज हेंबाडे यांनी तपास केला होता. सदर खटल्यात चार साक्षीदार तपासण्यात आले. युक्तिवाद ऐकल्यावर न्यायालयाने आरोपीस १५ महिने साधी कैद व एक हजार रुपयांचा दंड सुनावला.

या खटल्यात सरकारी वकील म्हणून के. एस. देशमुख व एम. एम. पठाण यांनी काम पाहिले. तर कोर्ट पैरवी म्हणून सहाय्यक फौजदार रावसाहेब वाघमारे यांनी कामकाज पाहिले.

# महापालिका करणार शहराचे सर्व्हेक्षण; नियोजन सुरू

## मिळकती, नळ कनेक्शन, बांधकाम परवान्यासह विविध माहिती करणार संकलित

सुराज्य/सोलापूर



शासनाच्या विविध योजनांसाठी आधारभूत माहितीची गरज असल्याने महापालिकेत महापालिकेच्या वतीने शहरातील एकूण मिळकती, नळ कनेक्शन, प्रॉपर्टी कार्ड, नळ मीटर, ड्रेनेज कनेक्शन, बांधकाम परवाना यासह विविध घटकांचा सर्वंकष सर्व्हे करण्यात येणार आहे. त्याचे नियोजन सुरू आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली.

या सर्वांकष सर्वेक्षणाच्या नियोजनाची बैठक महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी आयुक्त कार्यालयात पार पडली.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांसाठी शहरातील विविध सोयी सुविधा व घटकांची माहिती आवश्यक आहे ती माहिती संकलित करण्यासाठी हे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. सोलापूर शहरातील विविध घटकांचा सविस्तर सर्व्हे करून त्याची माहिती संकलित करण्यात येणार आहे. या संदर्भात ही नियोजन बैठक घेण्यात आली. या सर्वेक्षणात सोलापूर शहरातील सर्व मिळकती, नळ कनेक्शन्स, नळ मीटर, प्रॉपर्टी कार्ड, ड्रेनेज कनेक्शन, बांधकाम परवाना, वापर परवाना, मिळकत कर यासह विविध सोयी - सुविधांची माहिती संकलित करण्यात येणार आहे, असे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले. याबैठकीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त विद्या पोळ, मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, सार्वजनिक आरोग्य अभियंता विजयकुमार राठोड, विद्युत विभाग अभियंता राजेश परदेशी यांच्यासह प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### २.९५ लाख मिळकती; नळ कनेक्शन मात्र निम्मेच

सोलापूर शहरात एकूण २ लाख ९५ हजार मिळकती आहेत. त्यामध्ये गवसु अंतर्गत ४५ हजार मिळकतींचा समावेश आहे मात्र दुसरीकडे निम्मेच म्हणजे दीड लाखापर्यंतच अधिकृत नळ कनेक्शन असल्याची माहिती उपलब्ध आहे. तर मग इतर उर्वरित मिळकतीवर राहणारे कुटुंबीय पाणी कुठून वापरतात असा प्रश्न उपस्थित होतो, असेही आयुक्त म्हणाले.

### वापर परवाना न घेतल्यास दुप्पट दंड

ज्या मिळकतींवर मागील वर्षी नवे बांधकाम झाले आहे त्यांनी बांधकाम परवाना घेतला आहे मात्र वापर परवाना घेतला नाही तसेच मिळकत करही लागू झाला नाही. अशा मिळकतदारांना दुप्पट दंड आकारण्यात येणार आहे. ही योजना जुन्या मिळकतीला नव्हे तर नव्या मिळकतीसाठी राबविण्यात येणार आहे, असेही महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.




# परिसरातील बेकायदेशीर बाबींची माहिती पोलिसांना द्यावी : माने

## रमजानच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयात बैठक

सुराज्य/सोलापूर

उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा. शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायदेशीर बाबींची माहिती पोलीसांना द्यावे, असे आवाहन पोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी केले.

रजमान ईद उत्सवच्या अनुषंगाने शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुरूवारी १२ फेब्रुवारी रोजी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य सोलापूर महानगर पालिकेचे अधिकारी, शहर काझी, धर्मगुरु, शहरातील प्रमुख मस्जिदचे विश्वस्त शहारातील प्रमुख ईदगाह मैदान यांचे विश्वस्थ यांची पोलीस आयुक्त कार्यालय येथे संयुक्तपणे बैठक झाली. बैठकीचे प्रस्तावना पोलीस उप आयुक्त डॉ. दिपाली काळे यांनी करून बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.. यावेळी उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्यांनी सूचना मांडल्या. संबंधित महानगर पालिका अधिकारी यांनी या समस्या सोडविण्यात येतील असे अश्वस्त केले. ईदसाठी विशेष बंदोबस्त असणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.